। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८१ वा । मंगळवार दिनांक ०२ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी) परंडा पोलीस ठाणे तुळशीराम, अंबादास वय ३ वर्षे दोघे रा. वांगी खु. ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी हॉटेल छत्रपती चे समोर वांगी बु. शिवार येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक एअर रायफल व तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले परंडा पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद एअर रायफल व तलवार जप्त करुन फिर्यादी -सुशीलकुमार मुकुंद कोळेकर नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे .

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल.

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, महेबुब फकीर अ. शेख, वय ४५ वर्षे, रा. तालीम गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२९.०५.२०२६ रोजी मे. फेमस ट्रेडर्स पेढी शम्स चौक, खाजा नगर धाराशिव येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ रजनीगंधी पान मसाला, तुलसी रॉयल जाफरानी जर्दा, डायरेक्टर स्पेशल पान मसाला, गोवा १००० बादशाहा लाल रंगाचा पुडा हिरा का बाओबाजी पान मसाला, माणिकचंद पान मसाला, एम सेंटेड टोबॅको गोल्ड, रत्ना छाप तंबाखु३००, राजनिवास पान मसाला, व इतर सुपाऱ्या एकुण १,३१,२२२ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला अन्न सुरक्षा व औषधी प्रशासन म.राज्य धाराशिव यांचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## अहिल्याच्या लेकींनी मोठ्या उत्साहात साजरी केली

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती 'अहिल्या सखी मंच'च्या वतीने विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. अहिल्यादेवींचे आजोळ असलेल्या चोराखळी येथील पापनाश मंदिरात अभिषेक, पूजन व आरती करून जयंती सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.

जयंतीनिमित्त नवजात कन्यांचे स्वागत करून मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मातांना वस्त्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. मुलींनी यशवंत, गुणवंत आणि कीर्तिवंत होऊन माता अहिल्यादेवींच्या आदर्शांचा वारसा पुढे न्यावा, तसेच मुलींचे नाव 'अहिल्या' ठेवण्याचे आवाहनही मंचाच्या वतीने करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यकारभारातून लोककल्याण, धर्मकार्य, समाजसेवा आणि न्यायनिष्ठेचा आदर्श घालून दिला. भुकेल्यांची भूक आणि तहानलेल्यांची तहान ओळखून त्यांनी स्वतःच्या खजिन्यातून लोकांसाठी मदतीचा हात पुढे केला. देशभर उभारलेली मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि सांस्कृतिक केंद्रे आजही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे नेत अहिल्या सखी मंचाने 'अन्नपूर्णा मोफत अन्नछत्राला' अन्नदान करून गरजू रुग्णांच्या नातेवाईकांसाठी एका दिवसाच्या भोजनाची व्यवस्था केली.

स्नानाने देहशुद्धी, ध्यानाने मनशुद्धी आणि दानाने धनशुद्धी होते या अहिल्यादेवींच्या जीवनमूल्यांचा प्रचार करण्यासाठी मंचाच्या वतीने विविध जनजागृतीपर उपक्रमही राबविण्यात आले. संस्कृती ही भोगावर नव्हे तर त्यागावर उभी असते आणि प्रत्येक मानवामध्ये ईश्वराचा अंश आहे, या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमात अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिल्या सखी मंचच्या कार्यकारिणी अध्यक्षा डॉ. शैलजा कुलकर्णी, उपाध्यक्षा ड. जयश्री तेरकर, सचिव उषा लांडगे, कोषाध्यक्षा प्रमिला बावकर, सहसचिव शितल करडे, सहकोषाध्यक्षा मानसी डोलारे यांच्यासह मंचातील सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जयंतीनिमित्त आयोजित उपक्रमांमुळे परिसरात भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

## अट्टल घरफोड्या करणाऱ्या पकडुन त्याचे ताब्यातुन सोन्याचे

### दागीने, रोख रक्कम व इतर असा ४५ लाख रु. चा मुद्देमाल जप्त



धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस निरीक्षक विनोद ईज्जपवार यांना बातमी मिळाली की धाराशिव जिल्हयातील अटटल घरफोडया करणारा अजय श्रावन शिंदे हा सुंभा येथे आला आहे अशी माहिती मिळाली असता सदरची माहिती वरीष्ठांना कळवुन पोलीस अधिक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक . सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली स्वत पोनि विनोद इज्जपवार, स्थागुशा धाराशिव व स्थागुशाचे सर्व पथके रवाना होवुन माहिती मिळालेले ठिकाणी जावुन नमुद याचा शोध घेत असताना अजय हा पोलीसांना पाहुन पळुन जात असताना पोलीसांनी त्यास अतिशय शिताफीने पकडुन त्यास व श्रावन जमनाशा शिंदे या दोघांना ताब्यात घेवुन अधिक विश्वासात घेवुन जिल्हयातील घरफोडी चे गुन्हयाबदल विचारले असता त्यांनी सुरवातीस उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यापैकी अजय श्रावन शिंदे यास अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने धाराशिव जिल्हयातील पोस्टे बेंबळी, ढोकी, धाराशिव ग्रामीण, शिराढोण, मुरुम, लोहारा, वाशी, परंडा, येरमाळा, आनंदनगर हददीतील घरफोडीचे एकुण ३२ गुन्हे त्याचे इतर साथीदारासह केले असल्याचे सांगीतले. नमुद व्यक्तीने ताब्यातुन त्याचे हिशाला आलेले घरफोडीचे गुन्हयातील चोरीचे एकुण १८ तोळे सोने मिळुन आले, तसेच काही सोने विकुन आलेल्या पैशातुन एक ब्रेझा चारचाकी व एक नवीन बुलेट टु व्हिलर गाडी विकत घेतली असल्याचे सांगीतले. असा एकुण ४५,३५,०००/लाख रु. चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर, मा. अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि सचिन खटके, अमोल मोरे, पोह/ विनोद जानराव, शौकत पठाण, दयानंद गादेकर, नितीन जाधवर, बळीराम शिंदे, जावेद काझी, प्रकाश औताडे, समधान वाघमारे, बबन जाधवर, अमोल चव्हाण, अशोक ढगारे, राहुल नाईकवाडी, अमोल निंबाळकर, राठोड, प्रदीप वाघमारे, पुष्कर मुंगळे, मपोह / शोभा बांगर, चापोह / सुभाष चौरे, महेबुब अरब, विनायक दहिहंडे, प्रकाश बोईनवाड, दिपक डोंगरे, बाबा गुरव, रोहीत दंडनाईक, यांचे पथकाने केली आहे.

## मंदिरातील संताची परंपरा तेवत राहाण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य – सुधिर सस्ते



येडसी (प्रतिनिधी)-येडशीत वारकरी व धार्मिक परंपरा तेवत ठेऊन वारकरी संप्रदयांत येडशीचे नाव तेवत ठेवणाऱ्या मंदिरातील संताची परंपरा तेवत राहाण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल आसे उदोजक , चेअरमन व शैक्षणीक क्षेत्रात उतुंग कार्य करणारे व्यक्ति महत्व म्हणून ओळखले जाणारे सुधिर सस्ते येडशीकर यांनी दि ३० रोजी सायांकाळी ७ शनिवार रोजी येडशी येथील श्री संत वै रामकृष्ण भऊ,भगवान भाऊ , परमेश्वर महाराज (आश्रम ) मंदिर येथे मधुकरी आन्नदान सेवकांचा पुरस्कार सोहळ्या प्रसंगी आपले विचार मांडले.

हा सन्मान येडशी येथील श्री वै संत आश्रम मंदिर व सस्ते (बप्पा ) वारकरी सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चालत आसलेल्या वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी वर्गास गेली ३८ वर्षा पासुन मधुकरी देऊन सेवा करणाऱ्या ९ आन्नदात्यांचा सन्मान करण्यात आला .

हा सन्मान चेअरमन व उदोजक सुधिर सस्ते यांच्या प्रमुख उपस्थीत व हास्ते सन्मानित करण्यात आला यावेळी प्रध्यापक योगेश कुलकर्णी डि डि देशमुख श्रीकृष्ण मेटे यांची प्रमुख उपस्थिती होती . हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री महादेव सस्ते बाळासाहेब पवार आशोक देशमुख शुभम महाराज नवघरे ग्रामस्थ येडशीकर यांनी परीश्रम घेतले .

## अवैध सिगारेट आणि इतर तंबाखु जन्य उत्पादने विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल.

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रसाद रा. किलज ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी किलज ग्रामपंचायत कार्यालय जवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ तंबाखु ६५० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर मुंतकीम रा. गंधोरा गावात ग्रा.पं. कार्यालय जवळ धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी गंधोरा गावात ग्रा. पं. कार्यालय जवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला व तत्सव पदार्थ तंबाखु ७०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला.तर इमरा रा. इनामदार गल्ली नळदुर्ग ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी डायमंड पान स्टॉल बाजार लाईन नळदुर्ग येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला व तत्सव पदार्थ तंबाखु जन्य ३४५ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. मल्लीनाथ रा. भवानी नगर ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी बसस्थानक नळदुर्ग महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला व तत्सव पदार्थ तंबाखु जन्य ३१० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. विनोद रा. जळकोट ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी हर्ष पान शझ्रॅप पानटपरी मध्ये जळकोट येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला व तत्सव पदार्थ तंबाखु ६७० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. इसाक रा.इटकळ ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी ईटकळ ग्रा.पं. कार्यालय जवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला व तत्सव पदार्थ तंबाखु २७० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला.यावरुन पोलीसांनी तंबाखु जन्य साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द सिगारेट आणि इतर तंबाखु जन्य उत्पादने अधिनियम २००३ अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हे स्वतंत्र नोंदवले आहेत.

# धाराशिवच्या तहसीलदार डॉ. मृणाल जाधव ॲक्शन मोडमध्ये; मध्यरात्री अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली, निवासी उपजिल्हाधिकारी कडवकर तसेच उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्या सूचनेनुसार तहसील कार्यालय धाराशिव मार्फत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी मध्यरात्री स्वतः महसूल पथकासह धडक कारवाई करत मुरूमाची अवैधरित्या वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर व एक डंपर जप्त केला. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार महसूल विभागाला धाराशिव शहर परिसरात रात्रीच्या वेळी विनापरवाना मुरूम वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी कोणताही विलंब न करता गौण खनिज तपासणी भरारी पथकासह रात्री उशिरा विशेष तपासणी मोहीम हाती घेतली. दिनांक २८ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास मौजे धाराशिव शहरातील शाहूनगर परिसरात पथकाने अचानक धडक देत वाहनांची तपासणी सुरू केली.



तपासणीदरम्यान मुरूम या गौण खनिजाची वाहतूक करणारी तीन वाहने महसूल पथकाच्या निदर्शनास आली. वाहन चालकांकडे वाहतुकीसाठी आवश्यक असलेली परवानगी, रॉयल्टी पावत्या तसेच इतर वैध कागदपत्रांची मागणी करण्यात आली. मात्र चालकांना कोणतीही समाधानकारक कागदपत्रे सादर करता आली नाहीत. त्यामुळे संबंधित वाहतूक पूर्णपणे अवैध असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर महसूल प्रशासनाने तात्काळ कारवाई करत एक क्रमांक नसलेला दोन ट्रॅक्टर तसेच छोटा डंपर मुरूमासह जप्त केला. जप्त केलेली वाहने पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी तहसील कार्यालयाच्या ताब्यात ठेवण्यात आली आहेत.

संबंधित वाहन मालकांविरोधात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तसेच गौण खनिज नियमांनुसार दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शासनाचा महसूल बुडविणाऱ्या तसेच पर्यावरणाची हानी करणाऱ्या व्यक्तींविरोधात यापुढेही कठोर पावले उचलली जाणार असल्याचा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे.

धाराशिव तालुक्यात अवैध वाळू, मुरूम आणि इतर गौण खनिजांच्या उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असून पर्यावरणालाही फटका बसत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी कडवकर तसेच उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत.

तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात आक्रमक भूमिका घेत अनेक धडक कारवाया याआधी ही केल्या आहेत. त्यामुळे महसूल प्रशासनाचा धाक निर्माण झाल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी धाराशिव तालुक्यात मंडळनिहाय विशेष महसूल पथके तैनात करण्यात आली आहेत. प्रत्येक मंडळातील महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित गस्त, तपासणी आणि संशयित वाहनांवर तत्काळ कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही प्रकारचे अवैध उत्खनन अथवा विनापरवाना गौण खनिज वाहतूक आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून अशा मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत, असे तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी सांगितले. या कारवाईत तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी राजेश पडवळ, विनोद शिंदे, सतीश निंबाळकर आणि जयंत पाचकुडवे यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, तालुक्यातील सर्व मंडळांमध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर लक्ष ठेवण्यात येत असून भविष्यातही अशाच प्रकारच्या धडक कारवाया सुरू राहतील. या मध्यरात्रीच्या कारवाईमुळे अवैध गौण खनिज माफियांमध्ये खळबळ उडाली असून नागरिकांनी महसूल विभागाच्या कारवाईचे स्वागत केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## संकट ओळखुन वाटचाल असावी

अमेरिका-ईस्त्राईल मिळून इराणवर हल्ला करीत आहेत. युद्ध सुरूच आहे. हवाई हल्ले चालूच आहेत. कळीचा मुद्दा होर्मुझ सामुद्रधुनीचा आहे. अजूनही परवानागीशिवाय जहाज पुढे जात नाही. या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम जगातील बाजारावर झाला आहे. अनेक वस्तूचे दर वाढलेले आहेत. इंधनात वाढ झाली की, आपोआप सर्वच वस्तूचे दर वाढले जातात. इंधनाचा परिणाम होतो हे सर्वांना माहिती आहे. पेट्रोल पेक्षा सध्याला डिझेलची कमतरता भासत आहे. मोठ्या शहरात व्यावसायिक गॅसचा तुटवडा भासत आहे. अशा स्थितीत नागरिकांनी विचार केला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी वारंवार सुचना देत आहे. काटकसरीने वागा. गॅसचा वापर व इंधनाचा वापर मर्यादित करा. अशा सुचना वारंवार देत आहेत. सुचना वजा मार्गदर्शन चालू आहे. यावरून जनतेची परिस्थितीजन्य बाबी ओळखुन वागले पाहीजे. आज जरी काही बाबी स्पष्ट सांगितल्या जात नसल्या तरी त्या अप्रत्यक्ष ओळखणे आवश्यक आहेत. युद्धामुळे इंधनाचा पुरवठा इराण करू शकत नाही. परिस्थितीचा विचार केला तर ती बिघडली आहे. अमेरिकेचा वाढता दबाब आहे. रशिया हा भारताचा अनेक वर्षाचा मित्र आहे. त्याच्याकडून इंधन खरेदी करू नये असा ईसारा दिला आहे. भारताला मोठ्या प्रमाणात कच्चे तेल इराणकडून खरेदी केले जाते. गॅस खरेदी केला जातो. अशा स्थितीत भारताची कोंडी झाली आहे. याला भारतीय नागरिकांनी साथ देणे उचित ठरणारे आहे. आता पर्यंत भारतावर इंधनाचे मोठे संकट आले नव्हते मात्र आगामी काळात येवू शकते. त्यामुळे सावध झाले पाहिजे. परावलंबि वस्तू बाबत सतत सतर्क असले पाहिजे. भारताला आझादी मिळून सत्तरवर्षाचा काळ लोटला आहे, तरी करही बरबीत भारत स्वयंभू नाही. काय मेक इंडिया चालू आहे हेच कळून येत नाही. जगातील अनेक देश स्वयंभू आहेत. जगातील अनेक देश आपल्या पायावर उभा आहेत. पर्यायिही शोधले असून त्याचा वापर देखिल करीत आहेत. इंधन कशाला लागते तर अधिक तर दोन व चार चाकीसाठी लागते. विमान वगैरे नंतर बघू, अधिक दोन व चार चाकी गाड्या भारतात मोठ्या प्रमाणात वापरतात. पेट्रोल व डिझेलच्या रांगा दोन व चार चाकी मालकांच्या दिसून येतात. ही वस्तूस्थिती आहे. मोटारसायकल मध्ये अनेक प्रकार आहेत त्याचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो. कारण नसताना वापर होतो. कोणीही पायी चालायाला तयार नाही. ग्रामीण भागात प्रातविधीला मोटारसायकलवरून बाटली घेवून जाणारे अनेक दिसतील. अशा बाबीची माहिती असताना याला सरकारने इंधनाला पर्याय का शोधला नाही. चुक कोणाची? एक तर जगाला इंधन इराण पुरवितो आहे. भारतही याला अपदवाद नाही. ही बाब लक्षात घेता भारत सरकारने मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक गाड्या त्याही सौर उर्जावर चालणाऱ्या निर्माण करणे आवश्यक होते. अतिषय कमी प्रमाणात केल्या जात आहेत. त्याच्याही किंमती भारतीय जनसामान्यांना परवडणाऱ्या नाहीत. इंधनाला पर्याय द्यावयाचा झाला. पेट्रोल, डिझेलला पर्याय देणे उचित होते त्याकडे दुर्लक्ष केले. आता सरकारलाच हे संकट दूर करावे लागणार आहे. कोठूनही इंधन मागवावे लागेल. तो पुरवठा करावाच लागेल, त्यापेक्षाही दर वाढविले तर काय होईल? यदाकदाचित जनता सरकारला खाली खेचू शकते हा मोठा धोका आहे. त्यामुळे दरात वाढ अधिक कराल तर जनता कार्यक्रम करू शकते. सध्याला सत्ताधाऱ्यासाठी जमेची बाजू म्हणजे, पक्का पर्याय नाही. काँग्रेच्या युपीए दोनच्यावेळी असंख्य घोटाळे उघडे पडेल व काँग्रेसला पर्याय भाजपा मोदींजींच्या रूपात मिळाला, आज तीन टर्म भाजपाची सत्ता आहे. एकदा पर्याय मिळाला तर काही खरे नसते हे ओळखुन वाटचाल असली पाहिजे. महागाई कमी करू शकणार नाही. इंधनाचे भरमसाठ दर वाढविणार असाल तर काय होईल याचा विचार केला पाहिजे. आता जनतेनी काय केले पाहिजे. या बाबत विचार निर्णय घेतला पाहिजे. जनतेची स्वतः होवून कमी प्रमाणात ओढावलेल्या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकार करेल. लॉकडावुन करेल. ह्या बाबी जर-तरच्या आहेत. एक भारतीय नागरिक म्हणून जरूर विचार केला पाहिजे. विनाकारण खरेदी करू नये. आपल्याकडील जी काही पुंजी म्हणजे आर्थिक पैसालत्ता आहे तो खर्च करू नये. याची गरज कधी व कशी जागतिक युद्धाच्यावेळी पडेल हे आज सांगता येत नाही. सर्वात मोठी बाब जो पर्यंत युद्ध संपणार नाही तो पर्यंत अतिषय काटकसरीले वागले पाहिजे. इंधन व गॅस्चा वापर कमी केला पाहिजे. आवश्यकता आहे तेवढाच वापर करावा. पायी चालावे. शक्यतो सायकलचा वापर करावा. आपल्याकडे आर्थिकबाब काहीच नसेल तर युद्ध असेच काही काळ चालू राहील तर आपणच आपल्या कुटुंबावर मोठे संकट आणल्या सारखे होणार आहे. ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आहेत. तो पर्यंत जगात शांतता नांदणार नाही. त्यामुळे सतर्कता बाळगावी लागणार आहे. त्याच प्रमाणे पंतप्रधान यांनी केलेल्या आवाहनास साथ दिली पाहिजे. मजाक करणार किंवा समजणार असाल तर नुकसानीचे ठरू शकते. त्यामुळे विनाकारण खर्च करणे टाळावे. घरात किमान सहा महिणे पुरेल एवढे अन्नधान्याचा म्हणजे जीवनाश्यक वस्तू असल्या पाहिजेत. साठा करू नका परंतु सावधगिरी बाळगली पाहिजे. कधी काय होईल हे युद्धाच्यावेळी सांगता येत नाही. मुळात अमेरिकेला घमंड आहे तर इराण मागे हाटणारा देश नाही. चिवट आहे. त्यामुळे तो लढतो आहे. एकमहिणा झाला तरी माघार घेत नाही. त्यामुळे हे युद्ध दिर्घ काळ चालले तर भारतीयांवर संकट येवू नये याची काळजी घेतली पाहिजे. मुळात आपण सध्याला गाफील व अविचाराने वागत आहोत. हे धोकादायक ठरू शकते. गोरगरीब व जनसामान्यांनी विचार केला पाहिजे. याची संख्या अधिक आहे. श्रीमंत, नेतेमंडळी त्यांच्यावर अधिक परिणाम होणार नाही. त्यामुळे सावध वागून चालले पाहिजे. उधळपट्टी करू नये. संकट गडद होताना दिसून येत आहे. इंधनावर सर्व बाबी आवलंबून आहेत. या प्रसंगावरून पर्याय शोधणे व तातडीने आमलात आणणे काळाची गरज आहे. सौरउर्जा अधिक वापराची गरज आहे. भारतीयांनी सावध वागणे आवश्यक आहे. हे लक्षात ठेवणे काळाची गरज आहे.

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

**दरवर्षी २ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.**

या दिवसाचा इतिहास १९७५ सालातील एका महत्त्वपूर्ण घटनेशी जोडलेला आहे. फ्रान्समधील ल्योन शहरात त्या काळात लैंगिक कामगारांवर पोलिसांकडून सातत्याने होणारे छापे, अटकसत्रे आणि अन्यायकारक वागणूक याविरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. अनेक लैंगिक कामगारांनी सेंट-निझिएर चर्चमध्ये आश्रय घेत आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी सुरक्षिततेची हमी, पोलिसी अत्याचारांपासून संरक्षण आणि मानवी सन्मानाची मागणी केली. या आंदोलनाने जगभरातील लैंगिक कामगारांच्या हक्क चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या संघर्षाची आठवण म्हणून २ जून हा दिवस पुढे 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज या दिवसाचे स्वरूप जागतिक झाले असून अनेक देशांमध्ये या निमित्ताने परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम, मानवी हक्क मोर्चे आणि धोरणात्मक चर्चांचे आयोजन केले जाते.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवनाविषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

समाजातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे लैंगिक कामगारांविषयी असलेला सामाजिक कलंक. अनेकांना वाटते की या व्यक्तींना समाजात सन्मानाचे स्थान मिळण्याचा अधिकार नाही. त्यांच्याशी संवाद साधताना लोक टाळाटाळ करतात. त्यांना भाड्याने घर मिळणे कठीण होते. अनेक वेळा त्यांची मुले शाळांमध्ये भेदभावाला सामोरी जातात. काही कुटुंबे आपल्या मुलांना अशा मुलांशी मैत्री करण्यासही परवानगी देत नाहीत. अशा प्रकारच्या सामाजिक बहिष्कारामुळे लैंगिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे मानसिक आरोग्य प्रभावित होते. सततच्या अपमानामुळे आत्मविश्वास कमी होतो आणि समाजापासून दूरावण्याची भावना निर्माण होते.

लैंगिक कामगारांच्या जीवनातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हिंसा. ग्राहक, दलाल, गुन्हेगारी टोळ्या, स्थानिक गुंड, काही वेळा पोलिस यांच्याकडूनही त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक स्वरूपाच्या हिंसेच्या घटना अनेकदा घडत असतात. परंतु सामाजिक कलंक आणि न्याय मिळण्याबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी, हिंसाचाराचे चक्र सुरूच राहते. कोणत्याही नागरिकाप्रमाणे लैंगिक कामगारांनाही सुरक्षिततेचा आणि न्याय मिळविण्याचा अधिकार आहे, ही बाब समाजाने मान्य करणे आवश्यक आहे.

आरोग्य हा लैंगिक कामगारांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेला महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग, एचआयव्ही/एड्स, प्रजनन आरोग्याच्या समस्या, मानसिक ताण, नैराश्य आणि व्यसनाधीनता यांसारख्या अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः एचआयव्ही प्रतिबंधाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. कंडोम वापराबाबत जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि उपचार सुविधा यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, अजूनही अनेक ठिकाणी आरोग्यसेवा मिळविताना लैंगिक कामगारांना भेदभावाचा सामना करावा लागतो. डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचारी त्यांच्याशी पूर्वग्रहदूषित वागणूक करतात. त्यामुळे आरोग्य सेवा सर्वांसाठी समान आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

लैंगिक कामगारांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्नदेखील दुर्लक्षित राहतो. सततचा सामाजिक तिरस्कार, असुरक्षितता, हिंसा, आर्थिक ताण आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यामुळे अनेक व्यक्तींना नैराश्य, चिंता आणि भावनिक तणावाचा सामना करावा लागतो. मानसिक आरोग्याच्या सेवा या समुदायापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. त्यामुळे समुपदेशन, मानसोपचार आणि मानसिक आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि तो लैंगिक कामगारांनाही तितकाच लागू होतो.

लैंगिक कामगारांच्या मुलांचे जीवन अनेकदा संघर्षमय असते. समाजातील पूर्वग्रहांमुळे त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात अडथळे निर्माण होतात. काही मुलांना त्यांच्या पालकांच्या व्यवसायामुळे चिडवले जाते किंवा अपमानित केले जाते. परिणामी, अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडतात. शिक्षणाचा अभाव म्हणजे पुढील आयुष्यातील संधींची कमतरता. त्यामुळे गरिबी आणि सामाजिक वंचिततेचे चक्र कायम राहते. या परिस्थितीत शासन, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्रितपणे काम करून अशा मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिष्यवृत्ती, निवास सुविधा आणि भावनिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय. दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती तुलनेने गुंतागुंतीची आहे. येथे लैंगिक काम स्वतःमध्ये थेट गुन्हा नाही, परंतु त्याच्याशी संबंधित अनेक कृतींवर कायदेशीर निर्बंध आहेत. त्यामुळे लैंगिक कामगार अनेकदा कायदेशीर अनिश्चिततेत जगतात. अलीकडच्या वर्षांत न्यायालयांनी लैंगिक कामगारांच्या मानवी प्रतिष्ठेचा आणि घटनात्मक अधिकारांचा पुनरुच्चार केला आहे. न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हा दृष्टिकोन मानवाधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

लैंगिक कामगारांच्या सक्षमीकरणासाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संघटना कार्यरत आहेत. या संस्था आरोग्य सेवा, कायदेशीर मदत, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, समुपदेशन आणि जनजागृती यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देतात. अनेक ठिकाणी लैंगिक कामगारांनी स्वतःच्या संघटना स्थापन करून आपले प्रश्न मांडण्यास सुरुवात केली आहे. ही बाब त्यांच्या आत्मसन्मानासाठी आणि नेतृत्व विकासासाठी महत्त्वाची आहे. जेव्हा एखादा समुदाय स्वतःच्या प्रश्नांसाठी संघटित होतो, तेव्हा सामाजिक बदलाची प्रक्रिया अधिक प्रभावी ठरते.

स्त्रीवादी चळवळींमध्येही लैंगिक कामाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते हा व्यवसाय स्त्रियांच्या शोषणाशी संबंधित आहे, तर काहींच्या मते तो महिलांच्या स्वायत्ततेचा आणि निवडीच्या अधिकाराचा भाग आहे. या वादांमध्ये विविध मतभेद असले तरी लैंगिक कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मानवी हक्कांचे संरक्षण हा समान धागा दिसून येतो. त्यामुळे मतभेदांपलीकडे जाऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात लैंगिक कामगारांच्या असुरक्षिततेचे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले. लॉकडाऊनमुळे त्यांचे उत्पन्न अचानक बंद झाले. अनेकांकडे बचत नव्हती, सामाजिक सुरक्षा नव्हती आणि पर्यायी रोजगाराच्या संधीही नव्हत्या. परिणामी, हजारो कुटुंबांना अन्न, औषधे आणि निवाऱ्याच्या समस्या निर्माण झाल्या. या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी मदतीचा हात पुढे केला. या अनुभवाने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले.

आर्थिक सक्षमीकरण हा लैंगिक कामगारांच्या जीवनातील बदलाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अनेक व्यक्तींना पर्यायी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा लाभ मिळाल्यास त्यांचे जीवन अधिक स्थिर होऊ शकते. काही व्यक्तींना हा व्यवसाय सोडून इतर क्षेत्रांत काम करायचे असते, परंतु शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुनर्वसन व कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेब मालिका आणि वृत्तांकनामध्ये लैंगिक कामगारांचे चित्रण अनेकदा रूढ कल्पनांवर आधारित असते. काही वेळा त्यांना गुन्हेगारी, नैतिक अधःपतन किंवा सनसनाटीपणाशी जोडले जाते. अशा चित्रणामुळे समाजातील पूर्वग्रह अधिक बळकट होतात. माध्यमांनी त्यांच्या जीवनातील वास्तव, संघर्ष, मानवी भावना आणि सामाजिक प्रश्न यांचे संतुलित व संवेदनशील चित्रण करणे आवश्यक आहे. जबाबदार पत्रकारिता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

सामाजिक कार्याच्या क्षेत्रात लैंगिक कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा मानला जातो. सामाजिक कार्यकर्ते या समुदायासोबत काम करताना अधिकाराधारित दृष्टिकोन स्वीकारतात. त्यांच्या गरजा समजून घेणे, त्यांना उपलब्ध संसाधनांशी जोडणे, त्यांच्या नेतृत्व क्षमतेला प्रोत्साहन देणे आणि समाजातील भेदभाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हे सामाजिक कार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. सामाजिक न्यायाची संकल्पना तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा सर्वात वंचित घटकांनाही समान संधी उपलब्ध होतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध मानवी हक्क संघटना आणि जागतिक संस्था लैंगिक कामगारांच्या हक्कांसाठी कार्य करीत आहेत. त्यांचा भर आरोग्यसेवा, कायदेशीर संरक्षण, हिंसाचारापासून सुरक्षा आणि सामाजिक समावेशन यांवर असतो. या प्रयत्नांमुळे अनेक देशांमध्ये धोरणात्मक चर्चा सुरू झाल्या आहेत. तथापि, अजूनही अनेक समाजांमध्ये या विषयाविषयी खुलेपणाने चर्चा करण्यास संकोच वाटतो. त्यामुळे जनजागृती आणि संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान हा तिच्या व्यवसायावर अवलंबून नसतो. मानवी हक्कांची संकल्पना ही सर्वांसाठी समान आहे. लैंगिक कामगारांविषयी सहानुभूती, संवेदनशीलता आणि वास्तववादी दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. त्यांना केवळ दयेचे पात्र समजण्याऐवजी अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे ही लोकशाही समाजाची जबाबदारी आहे. त्यांच्या जीवनातील समस्या सोडविण्यासाठी केवळ कायदे किंवा योजना पुरेशा नाहीत; तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन आपल्याला विचार करण्यास भाग पाडतो की सामाजिक न्याय म्हणजे नेमके काय? समानता म्हणजे केवळ संधींची समानता की सन्मानाचीही समानता? एखादी व्यक्ती समाजाच्या कोणत्या स्तरात राहते यावर तिच्या मानवी हक्कांचे मूल्य ठरू शकते का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपण अधिक समतामूलक आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतो. शिक्षण, जनजागृती, सामाजिक संवाद, संवेदनशील धोरणे आणि मानवी हक्कांविषयीची बांधिलकी यांद्वारे लैंगिक कामगारांचे जीवन अधिक सुरक्षित, सन्माननीय आणि न्याय्य बनविता येऊ शकते.

आजच्या काळात विकासाची संकल्पना केवळ आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित राहिलेली नाही. विकास म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे. समाजातील कोणताही घटक उपेक्षित राहू नये, हीच खरी लोकशाही आहे. लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ एका समुदायाचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समावेशन आणि न्याय यांची परीक्षा आहे. या समुदायाकडे पूर्वग्रहांच्या चष्म्यातून नव्हे, तर मानवतेच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिनाचे खरे महत्त्व याच ठिकाणी आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी हक्क सार्वत्रिक असतात आणि ते कोणत्याही व्यवसाय, जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्थितीवर अवलंबून नसतात. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. या मूल्यांचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत समाज ठरतो. त्यामुळे २ जूनचा हा दिवस केवळ स्मरणदिन म्हणून नव्हे, तर सामाजिक संवेदनशीलता, मानवी प्रतिष्ठा आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीच्या संकल्पनेला बळ देणारा दिवस म्हणून साजरा केला जाणे आवश्यक आहे. अशा समताधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायप्रिय समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे, हीच या दिवसाला खरी मानवंदना ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**लेखक अ**

# प्रत्येक भाजीत शेंगदाण्याचा कूट घालणे टाळून पाहा

भाजी करण्याची पद्धत प्रत्येकाची वेगवेगळी असते. काही ठिकाणी आलं, लसूण, मिरची यांचं वाटण घालून भाज्या केल्या जातात, तर काही ठिकाणी भाज्या नुसत्या परतून घेतल्या जातात. काही ठिकाणी कांदा- टोमॅटो हा कोणत्याही भाजीचा प्रमुख घटक असतो तर काही भागांत शेंगदाण्याचा कूट खूप वापरला जातो. अगदी प्रत्येक भाजीत शेंगदाण्याचा कूट असतोच. ही पद्धत प्रामुख्याने सोलापूर, उस्मानाबाद या पट्ट्यात दिसून येते. अगदी भेंडीपासून ते पालेभाज्यांपर्यंत जवळपास सगळ्याच भाज्यांमध्ये दाण्याचा कूट घातला जातो (ळिवश शषषशली ेष शरींळपस ीं ीलह शिरपीीं वरळश्रू). पण हाच कूट काही प्रमुख आजारांचं कारण ठरत आहे. त्यामुळे थोडी काळजी घेणं गरजेचं आहे.

शेंगदाणे किंवा शेंगदाण्याचा कूट आरोग्यासाठी त्रासदायक आहे, असं मुळीच नाही. उलट ठराविक प्रमाणात शेंगदाणे खाणं आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. शेंगदाण्यांमध्ये प्रोटीन, फॅट, बायोटीन, नायसिन, थायमिन, फॉलिक ऍसिड, कॉपर, मॅंगनीज, फॉस्फरस, मॅग्नेशियम असे कित्येक पौष्टिक घटक असतात.

पण असं असलं तरी ते रोज खाणं मात्र टाळायला हवं. याविषयी काही डॉक्टरांनी दिलेली माहिती हेल्थन्यूजवर शेअर करण्यात आली आहे. यामध्ये डॉक्टर सांगतात की सरसकट सगळ्याच भाज्यांमध्ये शेंगदाण्याचा कूट घातल्यास अपचन, सिडीटी असा त्रास होऊ शकतो.

काही जणांना शेंगदाणे रोजच खाल्ल्यामुळे पित्ताचाही त्रास होतो, कारण शेंगदाण्यांमध्ये फॅट्स जास्त प्रमाणात असतात. शेंगदाणे खूप जास्त प्रमाणात खाल्ल्याने अंगावर खाज येणे, जुन्या लर्जीचा त्रास होणे, पोट फुगणे असेही त्रास होतात.

अतिप्रमाणात शेंगदाणे खाल्ल्याने बॅड कोलेस्टेरॉलही वाढू शकते. शिवाय दम्याचा त्रास असणाऱ्या लोकांनीही शेंगदाणे अतिप्रमाणात खाणं टाळायला हवं, असं तज्ज्ञ सांगतात. तुम्हालाही असे काही त्रास असतील तर काही दिवस प्रत्येक भाजीत शेंगदाण्याचा कूट घालणं टाळून पाहा. लगेच फरक जाणवेल.

# महामंदीत यंदा ‘कोरडा’ पावसाळा?

आधीच्या सरकारांनी केले नाही ते आपण केल्याचे ढोल केंद्र सरकार बडवत असते. मात्र महागाई रोखण्याचे ठाम धोरण सरकारकडे नसल्याचे दिसते. कमी पावसाचे जनतेच्या जीवनावर दुष्परिणाम होणार आहेत.

हवामान विभागाचा या वर्षीच्या मॉन्सून बाबतचा अंदाज केवळ सरकारचीच नव्हे, तर सर्व भारतीयांची चिंता वाढवणारा आहे. ‘नैऋत्य मॉन्सून’चा पाऊस यंदा ’सामान्य पेक्षा कमी’ होईल असे हवामान खात्याने म्हटले आहे. जून ते सप्टेंबर या काळात दीर्घ कालीन सरासरीच्या ९० टक्के पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यात ४ टक्के ’अधिक’ ’उणे’ बदल होण्याची शक्यता असते. यंदा ’सरासरी पेक्षा कमी ’ किंवा ‘अपुरा’ पाऊस होण्याची शक्यता ८४ टक्के एवढी जास्त असल्याचे हवामान विभागाचे म्हणणे आहे. ईशान्य भागात सरासरी एवढा, म्हणजे दीर्घ कालीन सरासरीच्या ९४ ते १०६ टक्के, मध्य भारत आणि द्वीप समूह भागात (दक्षिणेची राज्ये)९४ टक्क्यांपेक्षा कमी व वायव्य भागात दीर्घ कालीन सरासरीच्या ९२टक्क्यांपेक्षा कमी पाऊस होण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. या वर्षी ‘एल निनो’ चा प्रभाव जास्त असेल असे भाकित गेल्याच महिन्यात वर्तवण्यात आले होते. प्रशांत महासागराच्या मध्य व पूर्व भागातील तपमान वाढणे यास एल निनो प्रभाव म्हणतात. भारतातील त्याचा थेट परिणाम होत असतो. केरळमध्ये मॉन्सून दाखल होण्यास नेहेमीपेक्षा उशीर झाल्याने त्याच्या पुढील प्रगती बद्दल शंका निर्माण झाली आहे. पाऊस कमी झाल्यास त्याचा परिणाम दूरगामी असणार आहे.


अर्थव्यवस्थेला धोका

’एल निनो’चा प्रभाव मर्यादित राहण्याच्या अपेक्षेने हवामान विभागाने यंदा सरासरीच्या



९२ टक्के पाऊस होण्याचा अंदाज एप्रिलमध्ये वर्तवला होता. परंतु पावसाळ्याच्या प्रारंभी त्याचा प्रभाव वाढण्याची चिन्हे आहेत. ’इंडियन ओशन डायपोल’ या भौगोलिक / हवामान विषयक स्थितीचा अभ्यास करून ताजा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बंगालचा उप सागर व अरबी समुद्र यांच्या पृष्ठभागाच्या तपमानाच्या फरकास ’इंडियन ओशन डायपोल’ असे संबोधले जाते. जर अरबी समुद्राचे तपमान जास्त असेल तर ते सकारात्मक चिन्ह मानले जाते. त्यामुळे एल निनोचा प्रभाव बर्याच अंशी कमी होऊ शकतो व चांगला पाऊस होण्याची शक्यता वाढते. ’आयओडी’ची स्थिती स्थिर वरून सकारात्मक होण्याची आशा होती; पण पावसाळ्याच्या काळात ती स्थिर अथवा तटस्थ (न्यूट्रल) राहण्याची संभावना जास्त आहे. देशात पुरेसा पाऊस होण्यासाठी ती चांगली स्थिती नसेल. जूनमध्ये ’एल निनो’ कमकुवत राहण्याची, जुलै-ऑगस्ट या काळात तो मध्यम स्वरूपाचा राहण्याची अपेक्षा आहे. सप्टेंबरमध्ये त्याची तीव्रता वाढू शकेल. तसे घडले तर पावसाळ्याचा बराच काळ आधीच पूर्ण झालेला असेल. मात्र तरीही पावसाचे प्रत्यक्ष प्रमाण आणि त्याचे वितरण याबाबत काहीही सांगणे अवघड आहे. कमी पावसाचा परिणाम शेतीवर होईल. पिकांचे उत्पादन घटेल. तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती आहे. जल ऊर्जा प्रकल्पांतून वीज निर्मिती घटेल. वीज टंचाईचा परिणाम उद्योग धंद्यांवर होईल. पश्चिम आशियातील युद्धामुळे इंधनाचे दर वाढल्याने महा-गाई वाढू लागली आहे; त्यात भर पडेल. खतांवरील अनुदानासाठी अंदाजपत्रकात १ लाख ७१ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. युद्धामुळे खते, खत निर्मितीसाठी लागणारा गॅस व अन्य कच्चा माल यांची आयात महागल्याने या अनुदानाचा खर्च २ लाख ४१ हजार कोटी रुपये होण्याची चिन्हे आहेत. खाद्य तेलांवरील आयात शुल्क वाढवण्याचा केंद्र सरकार विचार करत आहे. खाद्य तेले महागल्यास सर्व साधारण महागाई आणखी वाढेल. महागाई भत्ता सरकारी कर्मचार्यांना मिळतो; इतरांना नाही. नागरिकांची क्रयशक्ती कमकुवत झाल्याने मागणी कमी होईल. त्याचा परिणाम उत्पादनावर होऊन कामगार कपात होईल व बेरोजगारी वाढेल. सरकारचा कर महसूल घटेल. त्यामुळे आर्थिक तूट वाढेल. अनुदाने देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांना जास्त कर्ज घ्यावे लागेल. त्यामुळे कर वाढीचे व महागाईचे एक दुष्ट चक्र सुरु होईल. एल निनोला तोंड देण्याची तयारी झाल्याचा दावा सरकारने केला असला तरी त्या बद्दल शंका आहे. सामान्यांना मात्र कोरड्या पावसाळ्याच्या संकटास सामोरे जावे लागणार आहे.

## कबीर दासांचे अनमोल विचार



**१. सत्य आणि वाणीऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोये।औरन को शीतल करे, आपहुं शीतल होए।।**
अर्थ: माणसाने नेहमी अशी गोड वाणी बोलावी, ज्यामुळे इतरांना सुख मिळेल आणि स्वत:चे मनही शांत व आनंदी राहील.**२. वेळेचे महत्त्वकाल करे सो आज कर, आज करे सो अब।पल में प्रलय होएगी, बहुरि करेगा कब।।**अर्थ: कोणतेही चांगले काम उद्यावर टाकू नका. जे करायचे आहे ते आजच आणि आत्ताच करा, कारण पुढच्या क्षणी काय होईल हे कोणीच सांगू शकत नाही.
**३. खरा ज्ञानीपोथी पढ़ि पढ़ि जग मुआ, पंडित भया न कोय।ढाई आखर प्रेम का, पढ़े सो पंडित होय।।**अर्थ: पोथ्या-पुराणे वाचून जग संपले, पण कोणीही खरा ज्ञानी बनला नाही. ज्याने प्रेमाची खरी भाषा शिकली, तोच खरा ज्ञानी (पंडित) होय.

## राष्ट्रीय पक्षी मोराविषयी मनोरंजक माहिती



आपला राष्ट्रीय पक्षी म्हणून देखण्या आणि सुंदर मोराची निवड अगदी योग्य आहेच पण भारताप्रमाणेच तो श्रीलंका आणि म्यानमार या देशांचाही राष्ट्रीय पक्षी आहे. २६ जानेवारी १९६३ मध्ये त्याला भारताने राष्ट्रीय पक्षी म्हणून घोषित केले. मोर हा मोठा पक्षी असून त्याची लांबी साधारण ५ फुट, उंची साधारण दोन फुट असते आणि वजन सरासरी ५ ते ६ किलो असते. त्याच्या शरीराचा ६० टक्के भाग म्हणजे त्याचा पिसारा असतो. हा असा बहुदा एकमेव पक्षी असावा जो मादीपेक्षा म्हणजे लांडोरीपेक्षा देखणा आहे. लांडोरीला पिसारा नसतो आणि तिच्या डोक्यावर छोटा तुरा असतो. लांडोरीला आकर्षित करण्यासाठी मोर आकर्षक नृत्य करतो आणि वेगवेगळे आवाज काढतो.

पावसात मोर नाचतात तेव्हा त्यांचे पंख तुटतात. ऑगस्ट मध्ये तर पिसारा पूर्ण गळतो पण उन्हाळा सुरु होण्याच्या वेळी त्यांना पुन्हा पिसे येतात. मोर पाळता येतात पण खुल्या जागेत ते अधिक चांगले जगतात. लांडोर अंडी घालताना घरटे बांधत नाही तर सुरक्षित वाटेल त्याजागी अंडी घालते. ती एकावेळी ५ ते ६ अंडी देते. जानेवारी ते ऑक्टोबर हा अंडी घालण्याचा काळ असून ही अंडी चकमदार दिसतात.

मोर रात्री उभ्या उभ्या झाडावर झोपतात. त्यांची नजर अतिशय तेज असते तसेच वास घेण्याची क्षमता तीव्र असते. अन्य जंगली प्राणांची चाहूल त्यांना लगेच लागते. मोरांचे आयुष्य २५ ते ३० वर्षांचे असते. मोराचे पंख घरात समृद्धी आणतात असा समज आहे. जेथे मोराची पिसे असतात तेथे साप येत नाहीत. मोराची पिसे सकारात्मक उर्जा देतात. म्हणून अनेक भगत किंवा तत्सम तांत्रिक बाधा झालेल्यांच्या शरीरावरून मोरपिसांचा पंखा फिरवितात. विद्येची देवी शारदा हिचे वाहन मोर आहे त्यामुळे पुस्तकात मोरपिसे ठेवणे शुभ मानले जाते.मोर निळे, हिरवे आणि पांढऱ्या रंगाचे असतात. भारत, नेपाळ आणि श्रीलंकेत निळे, जावा, म्यानमार आणि इंडोनेशिया येथे हिरवे मोर दिसतात. पांढरा मोर अल्बिनो मोर आहे म्हणजे त्याच्यात रंगद्रव्ये नसतात.

## लाईफ पार्टनरच्या भावना समजून घेताना

जीवनसाथीची काळजी घेणे म्हणजे केवळ गरजा भागवणे नव्हे, तर एकमेकांच्या भावना समजून घेणे होय. संवाद, आदर आणि छोट्या-छोट्या आनंदाच्या क्षणांतून नातं घट्ट होतं. जोडीदाराला सुरक्षित, प्रेमळ आणि समजून घेतलेले वाटण्यासाठी या मुख्य गोष्टी लक्षात ठेवा :१. मोकळा संवाद आणि वेळ एकमेकांसाठी वेळ काढा: दिवसातून काही वेळ फक्त दोघांसाठी ठेवा, ज्यामध्ये ऑफिस किंवा कौटुंबिक समस्यांशिवाय फक्त एकमेकांविषयीच्या चांगल्या गोष्टींवर बोला.लक्ष देऊन ऐका जोडीदाराचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्या. त्यांना काय वाटते हे समजून घेण्याचा प्रयत्न करा.२. आदर आणि प्रशंसा (ठशीशिलीं -ींशिलळर-ींळेप)छोट्या गोष्टींचे कौतुक: त्यांच्या लहान-सहान प्रयत्नांचे (जसे की आवडता स्वयंपाक करणे, घराची व्यवस्था लावणे) आवर्जून कौतुक करा.आदर राखा: इतरांसमोर कधीही जोडीदाराचा अपमान करू नका. दोघांमधील मतभेद खाजगीत सोडवा.३. भावनिक आधार (एोींळेपरश्र ड्डीीीी)सुख-दुःखात सोबत: आनंद असो वा दुःख, प्रत्येक परिस्थितीत जोडीदाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा.भावना समजून घ्या: जोडीदार जर खूप भावनिक असेल, तर त्यांना धीर द्या आणि आधार द्या.४. छोटे सरप्राईज आणि प्रेमळ स्पर्श (डीीळिीशी -षषशलींळेप) सरप्राईज द्या: त्यांना आवडणारी एखादी वस्तू किंवा त्यांचा आवडता पदार्थ आणून त्यांना सुखद धक्का द्या.स्पर्श खूप महत्त्वाचा आहे: मायेने डोक्यावरून किंवा पाठीवरून फिरवलेला हात अनेकदा शब्दांपेक्षा जास्त प्रेम आणि सुरक्षितता देतो.५. मदत आणि सहकार्य (ड्डीीीी उेशीरींळेप)कामाची विभागणी: घरकामात किंवा रोजच्या जबाबदाऱ्यांमध्ये एकमेकांना मदत करा.मर्यादांचा आदर करा: जोडीदाराच्या वैयक्तिक जा-गेचा (झशीीपरश्र डरलिश) आणि आवडी-निवडींचा आदर करा.



## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



मात्र काळानुरूप संकल्पना बदलत गेल्याचे दिसून येते. आज कॉलेजमध्ये एखादी मैत्रीण आली नाही आणि तिच्या मित्रांनी तिला न येण्यामागचे कारण विचारले तर ती थेट व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर मासिक पाळी आल्याचे सांगते. महाविद्यालयच नव्हे तर इतर कोणत्याही ठिकाणी स्त्रिया या थेट मासिक पाळी आल्याचे सांगतात. हा बदल केवळ स्त्रियांनी स्वतहून करवून घेतला नसून पुरुषांनीदेखील त्यांच्या या निर्धास्तपणाला साथ दिली आहे. आज अनेक ठिकाणी पुरुष पत्नी, बहीण, मुलगी किंवा अगदी मैत्रिणीसाठीही मेडिकल स्टोअरमध्ये जाऊन सॅनिटरी नॅपकिन घेऊन येतात.


## २ Joke — विनोद




प्रियांका : अगं विद्या, मझे पैसे कधी परत करणार आहेस?

विद्या : कसं सांगू? मी काय ज्योतिषी आहे का?

## ३ Message — संदेश



Do abhinetao ke bachche aapas main baat kar rahe the.
Pahle bachcha:-pata hai,mere papa kal nai mummy laye hain ,wo bahot achchi hai.
Doosra bachcha:- pata hai pata hai, pichle saal who meri mummy reh chuki hain.

## ४ Thought — सुविचार

विचारी माणूस तत्त्वज्ञानाने देवमाणूस बनतो.

\- अज्ञात



**संस्कृत सुभाषित**

**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**
(शांतीपर्व, अध्याय १०३, श्‍लोक ९, महाभारत)
अर्थ - शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार

### आडवे शब्द

१. गप्पागोष्टींचा शौक असलेला
४. आजूबाजूला
७. अगरबत्ती
९. त्याचप्रमाणे
१०. वर्ष, साल
११. फाशीचा खांब
१२. पाणी
१४. घसरगुंडी
१५. लहान
१६. विजयी, कीर्तीमान
१८. मृत्यूचा राजा
२०. कृष्ण
२१. नृत्य, नर्तन
२२. होडी
२३. फसवणूक
२५. एकरूप
२७. लेंगा
२९. जन्मदाता
३१. नारायणाचा मंत्र जपणारा
३२. माळी
३३. मिरवणूक
३५. साहित्यातील शूरत्वाचा रस
३६. पोलिस
३९. घोंगडी विणणारी जमात
४१. नवरा (ग्रामीण)
४२. माझे
४४. कान ताठ करणे
४६. वरचढ
४७. घर (हिंदी)
४९. येऊन पोहोचणे
५१. लढाई, चुरस
५२. कनवट
५३. उणीव
५६. शामलवर्णी
५७. युद्धक्षेत्र
५८. बर्फाळ प्रदेशातील केसाळ प्राणी
५९. बघा!
६०. परावर्तित ऊन
६२. जागृती
६५. लाकडी वस्तू तयार करणारा
६७. बोलीभाषेत मुख्याध्यापक
६९. दुर्योधनमित्र
७०. पळणे
७१. विमानवेधी यंत्रणा
७२. भ्रमर, भुंगा

### उभे शब्द


१. गुप्त, खाजगी
२. छडीची वनस्पती
३. तिबेटची राजधानी
४. जन्म महिना
५. पर्जन्यकाळ
६. श्रीमंत
७. जमीन व पाणी दोन्ही ठिकाणी वावरणारा
८. शक्तिमान
१०. उजवा, उजवीकडील
१३. रम्य
१७. तजवीज
१९. जनतेचा कौल
२०. संधीसाधू ही स्वत:ची बचावतात!
२१. ज्ञानेश्वरांचे समाधी स्थान शोधणारे संत
२३. झोळी घेऊन फिरणारा
२४. गाजावाजा
२६. शाश्वत, चिरंतन
२७. झाडाचे कात टाकणे
२८. मोठा, जास्त
३०. ओला गोळा
३४. ढीग
३६. शंकराने पचविलेले विष
३७. दडवून ठेवणे
३८. भटकबहाद्दर
४०. मौल्यवान खडा
४१. कणीदार
४३. धान्याचे वजन मोजण्याचे एक जुने परिमाण
४५. दुर्लक्ष करणे
४७. माया
४८. 'अ'चा 'आ' याच्यामुळे होतो
५०. मान्यता, संमती
५१. रेचक
५२. मिठी
५३. थोडेफार
५४. सिद्ध
५५. प्रधानजीचा 'बॉस'
५६. सरळमार्गी
५७. पांढराशुभ्र प्राणी
६१. इमारतीच्या पायात वापरला जाणारा राडारोडा
६३. उष्ण
६४. कळशी
६६. कागदाचे एक परिमाण
६७. शत्रूचे गुप्तपणे काम करणारा
६८. फक्त, केवळ
६९. मांडी, आकडा

### आडवे उत्तरे

१.गोष्टीवेल्हाळ ४.जवळपास ७.उदबत्ती ९.तसा १०.सन ११.वधस्तंभ १२.नीर १४.अवनती १५.सान १६.यशवंत १८.यमराज २०.काळा २१.नाच २२.तर २३.फसगत २५.समरस २७.पायजमा २९.वडील ३१.नारद ३२.बनकर ३३.वरात ३५.वीररस ३६.हवालदार ३९.सनगर ४१.दादला ४२.मम ४४.टवकारणे ४६.वरताण ४७.मकान ४९.दाखल होणे ५१.सामना ५२.कडोसार ५३.कमतरता ५६.सावळा ५७.समरभूमी ५८.याक ५९.पहा ६०.कवडसा ६२.जागर ६५.सुतार ६७.हेडमास्तर ६९.अंगराज ७०.धावणे ७१.रडार ७२.मधुकर

### उभे उत्तरे

१.गोपनीय २.वेत ३.ल्हासा ४.जन्ननमास ५.पावसाळा ६.सधन ७.उभयचर ८.बळवंत १०.सव १३.रमणीय १७.तरतूद १९.जनमानस २०.कातडी २१.नामदेव २३.फकीर २४.गव-गवा २६.सनातन २७.पालवी फुटणे २८.जबर ३०.लगदा ३४.रास ३६.हलाहल ३७.लपवणे ३८.रमताराम ४०.रतन ४१.दाणेदार ४३.मण ४५.कानाडोळा करणे ४७.ममता ४८.काना ५०.होकार ५१.सारक ५२.कव ५३.कमीजास्त ५४.तयार ५५.महाराज ५६.साधासुधा ५७.ससा ६१.डबर ६३.गरम ६४.घागर ६६.ताव ६७.हेर ६८.मात्र ६९.अंक






## थोडक्यात/ संक्षिप्त

### आरसीबी च्या विजयानंतर जितेश शर्मा आणि हर्षा भोगलेंचा मराठीतून संभाषण

मुंबई-अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात आयपीएल २०२६ चा फायनल सामना पार पडला. या सामन्यात आरसीबीने ५ विकेटने विजय मिळवला. सलग दुसऱ्यांदा आयपीएलची ट्रॉफी जिंकणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ हा आयपीएलच्या इतिहासातील तिसरा संघ ठरला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आय ऐतिहासिक विजयानंतर हर्षा भोगले यांनी आरसीबीचा स्टार खेळाडू जितेश शर्मा याच्याशी मराठीतून संवाद साधला. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. जितेश शर्माचा मराठीतून संवाद : आरसीबीचा स्टार फलंदाज जितेश शर्मा हा मूळचा महाराष्ट्रातील नागपूरचा आहे. आयपीएल २०२५ ऑक्शनमधून जितेश शर्माला आरसीबीने विकत घेतलं होतं. मागील दोन सीजनपासून जितेश शर्मा हा आयपीएलमध्ये आरसीबीकडून खेळतोय.

### रोहित-विराटसोबत वैभव सूर्यवंशी टीम इंडियामध्ये कधी खेळताना दिसणार?

मुंबई-आयपीएल २०२६ मधील आपल्या स्फोटक कामगिरीने क्रिकेटविश्वाला थक्क करणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीबाबत आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आपली भूमिका स्पष्ट केली आहे. संपूर्ण स्पर्धेत धडाकेबाज फलंदाजी करत वैभवने भारतीय संघातील भविष्यासंदर्भातील चर्चांना अधिकच वेग दिला आहे. राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या बिहारच्या या युवा फलंदाजाने आयपीएल २०२६ मध्ये सर्वाधिक ७७६ धावा करत ऑरेंज कॅप पटकावली. तब्बल २३७.३० च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी करत त्याने संपूर्ण हंगामात गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली. आयपीएल २०२६ च्या समारोपानंतर बीसीसीआय सचिव देवाजीत सैकिया यांनी वैभवचे भरभरून कौतुक केले. त्याच्या भविष्यासंदर्भात बोलताना त्यांनी सकारात्मक संकेत दिले. सैकिया म्हणाले, मफ्हा आयपीएल हंगाम अतिशय शानदार ठरला.

### कोणासोबत खेळणार पहिला सामना? वैभव सूर्यवंशी उतरणार मैदानात

दिल्ली-इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा सीजन आता समाप्त झाला आहे. आता पुन्हा टीम इंडियाचं वेळापत्रकानुसार आंतरराष्ट्रीय सीजनला सुरुवात होणार आहे. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात टीम इंडिया आपला पहिला सामना खेळण्यासाठी उतरेल. ६ जून पासून न्यू चंदीगडमध्ये अफगाणिस्तान विरुद्ध एकमेव टेस्ट सामना खेळवला जाणार आहे. या टेस्ट सामन्यात टीम इंडियाचं नेतृत्व शुभमन गिल करेल तर केएल राहुल, यशस्वी जायसवाल, ऋषभ पंत आणि मोहम्मद सिराज या खेळाडूंना संघात संधी मिळाली आहे. वनडे वर्ल्ड कपच्या तयारीला सुरुवात : एक टेस्ट सामना खेळल्यावर टीम इंडियाचा संघ हा वर्ल्ड कपच्या तयारीला सुरुवात करेल आणि अफगानिस्तान विरुद्ध तीन वनडे सामन्यांची वनडे सीरिज खेळेल.

### १९ पदके जिंकल्याबद्दल पंतप्रधानांकडून भारतीय संघाचे अभिनंदन

नवी दिल्ली-२० वर्षाखालच्या २२ व्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भारतीय संघाचे अभिनंदन केले आहे.
या स्पर्धेत १० सुवर्णपदकांसह एकूण १९ पदके जिंकल्याबद्दल पंतप्रधानांनी भारतीय संघाचे अभिनंदन केले आहे.या यशातून भारताच्या युवा खेळाडूंच्या दृढनिश्चयाची आणि त्यांची उत्कृष्टतेची प्रचिती येते असे पंतप्रधानांनी म्हटले आहे.
हे यश आगामी काळात देशाच्या असंख्य युवांना क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडण्यासाठी प्रेरणा देईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे.पंतप्रधानांनी एक्स या समाज माध्यमावर सामायिक केलेला संदेश :२० वर्षाखालच्या २२ व्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत १० सुवर्णपदकांसह एकूण १९ पदके जिंकणाऱ्या भारतीय संघाचे अभिनंदन.

### विजेतेपदानंतर विराट कोहलीची भावूक

नवी दिल्ली -रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने शानदार कामगिरी करत आयपीएल २०२६ चे विजेतेपद पटकावले. रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली, आरसीबीने अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सला ५ गडी राखून पराभूत केले. विजेतेपदाच्या सामन्यात आरसीबीच्या विजयाचा शिल्पकार विराट कोहली होता. आरसीबीने विजेतेपद यशस्वीपणे राखल्यानंतर, कोहलीने आपल्या सोशल मीडियावर एक पोस्ट केली, जी क्षणाधार्त व्हायरल झाली.
विराट कोहलीने मएक्सफ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले, मफ्गेल्या वर्षी आम्ही स्वतःला एक प्रश्न विचारला होता: आपण सलग दोनदा विजेतेपद जिंकू शकतो का? आणि आम्ही ते पुन्हा करून दाखवले.आयपीएलच्या अंतिम सामन्यात कोहलीने शानदार फलंदाजी केली.

# केवळ जिंकलो नाही, वर्चस्व गाजवले!

## सलग दुसऱ्या आयपीएलजेतेपदानंतर बंगळूरुचा कर्णधार पाटीदारची प्रतिक्रिया

रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने गुजरात टायटन्सला धूळ चारत सलग दुसऱ्यांदा आयपीएलचे जेतेपद पटकावले आहे. कर्णधार रजत पाटीदारने आपल्या ३३ व्या वाढदिवशी करंडक उंचावत 'आम्ही केवळ जिंकलो नाही, तर वर्चस्व गाजवले' अशा शब्दांत संघाचे कौतुक केले



आयपीएलचे सलग दुसरे जेतेपद पटकावल्यानंतर करंडकासह आनंद व्यक्त करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघ

अहमदाबाद : कोणतीही स्पर्धा जिंकणे अवघडच, पण त्याहूनही अवघड म्हणजे गतवर्षीचे जेतेपद टिकवणे! रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाने हे अवघड काम करून दाखवताना सलग दुर्सया वर्षी 'आयपीएल'चे जेतेपद पटकावण्याची किमया साधली. बंगळूरुचा कर्णधार रजत पाटीदारने या कामगिरीबाबत आनंद व्यक्त करतानाच 'आम्ही केवळ जिंकलो नाही, तर प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले,' असे म्हणत संघ-सहकार्यांची पाठ थोपटली.
बंगळूरुचा संघ तब्बल १८ वर्षे 'आयपीएल' जेतेपदाच्या शोधात होता. कोहली, गेल, डिव्हिलियर्स असे एकाहून एक मातब्बर फलंदाज संघात असूनही बंगळूरुला जेतेपद हुलकावणी देत होते. परंतु गतवर्षी प्रशिक्षक अँडी फ्लॉवर आणि बंगळूरुच्या व्यवस्थापनाने मिळून लिलावात संतुलित संघ तयार करण्यास प्राधान्य दिले. तसेच नेतृत्वाची धुरा पाटीदारकडे सोपविण्यात आली. या धाडसी निर्णयांचे फळ बंगळूरुला मिळाले असून त्यांनी सलग दोन वेळा 'आयपीएल' जिंकण्याची कामगिरी केली आहे. अशी कामगिरी करणारा बंगळूरु केवळ तिसरा संघ ठरला. यापूर्वी चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्सने असे यश संपादन केले होते.
बंगळूरुने यंदाच्या हंगामाची सुरुवात घरच्या मैदानावर सनरायजर्स हैदराबाद संघाचा धुव्वा उडवत केली होती. त्यानंतर कामगिरीत सातत्य राखत त्यांनी साखळी फेरीअंती गुणतालिकेत अग्रस्थान मिळवले. मग 'क्वालिफायर-१' आणि अंतिम लढतीत गुजरात टायटन्सला धूळ चारत बंगळूरुने जेतेपद आपल्याकडे राखण्यात यश मिळवले.
''अगदी खरे सांगायचे तर गेल्या वर्षी आमच्यावर प्रचंड दडपण होते. परंतु आम्ही जेतेपदाची प्रतीक्षा गतवर्षी संपवली आणि गोष्टी बदलल्या. यंदा आम्हाला शांतपणे आमचा सर्वोत्तम खेळ दाखवता आला. आम्ही संपूर्ण स्पर्धेदरम्यान सातत्य टिकवले. आम्ही केवळ खेळलो किंवा जिंकलो नाही, तर प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले,'' असे पाटीदार रविवारी झालेल्या अंतिम लढतीनंतरच्या पत्रकार परिषदेत म्हणाला.
'आम्ही संपूर्ण स्पर्धेत दबदबा राखू याची खात्री होतीच. तसेच सलग दुर्सयांदा जेतेपद पटकावण्याचाही विश्वास होता. आम्ही आमचे ध्येय गाठले याचा निश्चितच आनंद आहे,'' असेही पाटीदारने नमूद केले.
विशेष म्हणजे, पाटीदारला आपल्या ३३व्या वाढदिवशीच 'आयपीएल'चा करंडक दुर्सयांदा उंचावण्याची संधी मिळाली. ''वाढदिवसाची यापेक्षा चांगली भेट मिळूच शकली नसती. आमच्या सांघिक कामगिरीबाबत मी समाधानी आहे. आता जेतेपदाची हॅटट्रिक कशी साधता येईल याकडे आम्ही लक्ष केंद्रित करू,'' असेही पाटीदारने सांगितले.
कोहलीचे विशेष कौतुक-अंतिम लढतीत अवघड खेळपट्टीवर विराट कोहलीने ४२ चेंडूंत नाबाद ७५ धावांची खेळी करत बंगळूरुला विजयी केले. त्यामुळे सामन्यानंतर कर्णधार पाटीदारने त्याचे विशेष कौतुक केले. ''कोहलीला खास गोष्टी करायची सवय आहेच. तो किती उच्च दर्जाचा खेळाडू आहे हे आपण सर्व जाणतोच. त्याच्याबद्दल बोलण्यासाठी मला शब्द अपुरे पडतील. आम्हाला मैदानावर आणि मैदाबाहेरही त्याच्याकडून खूप शिकायला मिळते,'' असे पाटीदार म्हणाला.
आमच्या संघातील खेळाडूंची क्षमता आम्हाला ठाऊक होती. स्वतःच्या खेळावर लक्ष केंद्रित केले आणि योजनांची योग्य अंमलबजावणी केली, तर आम्ही स्पर्धेतील सर्वोत्तम संघ ठरू याची खात्री होती,'' असे कोहली अंतिम लढतीनंतर म्हणाला.
'स्ट्राइक रेट' सुधारणेसाठी मानसिकतेतील बदल अंतिम लढतीत गुजरात टायटन्सविरुद्ध कोहलीने ४२ चेंडूंत नाबाद ७५ धावा फटकावल्या. त्याने १८व्या षटकातील अखेरच्या दोन चेंडूंवर चौकार आणि षटकार खेचत बंगळूरुच्या विजयावर शिक्कामोर्बत केले. त्याने अवघ्या २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे 'आयपीएल' कारकीर्दीतील सर्वांत जलद अर्धशतक ठरले.''माझ्याकडे दुसरा पर्याय नाही. आता युवा खेळाडू पुढे येऊन अतिशय निडरपणे आणि आक्रमक शैलीत फलंदाजी करत आहेत. त्यामुळे मलाही धावांची गती वाढवणे भाग पडले आहे. परंतु खेळातील नाही, तर मानसिकतेतील बदलामुळे हे शक्य झाले आहे. गोलंदाजावर कसे दडपण निर्माण करता येईल आणि अधिकाधिक धावा कशा करता येतील याचाच मी विचार करतो,'' असे कोहलीने नमूद केले.यंदाच्या 'आयपीएल' हंगामातील पहिल्या १० सामन्यांत बंगळूरुच्या विविध आठ खेळाडूंनी सामनावीराचा पुरस्कार मिळवला. ही सर्वाधिक समाधान देणारी बाब ठरल्याचेही कोहली म्हणतो.

#### गतवर्षीसारखे दडपण नव्हते!

बंगळूरुच्या संघाने ङ्गआयपीएलफ जेतेपदाची १८ वर्षांची प्रतीक्षा गेल्या हंगामात संपवली. हे यश अत्यंत महत्त्वाचे ठरल्याचे कोहलीला वाटते. ङ्गयंदा गेल्या वर्षीसारखे दडपण जाणवत नसल्याचे मी सहकार्यांना म्हणालो होतो.

#### २० कोटींचे पारितोषिक

आयपीएलचे जेतेपद पटकावल्याबद्दल बंगळूरु संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) २० कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. उपविजेता गुजरात संघ १२.५० कोटी, तर राजस्थान रॉयल्स संघ ७ कोटी आणि सनरायजर्स हैदराबाद संघ ६.५० कोटी रुपयांचा मानकरी ठरला.

#### निर्णायक -कोहली

अहमदाबाद : वयाच्या ३७व्या वर्षी आणि १९ हंगाम खेळल्यानंतर आयपीएल मधील सर्वांत जलद अर्धशतक साकारर्णाया विराट कोहलीने खेळातील नाही, तर मानसिकतेतील बदलामुळे ङ्गस्ट्राइक रेटफमधील सुधारणा शक्य झाल्याचे वक्तव्य केले. तसेच विजयी षटकार मारून संघाला अंतिम रेषा पार करून देणेही स्वप्नवत असल्याची भावना त्याने व्यक्त केली.

#### विजयी मिरवणूक नाही

गतवर्षीप्रमाणे दुर्घटना घडू नये यासाठी यंदा बंगळूरु संघाची विजयी मिरवणूक ठेवण्यात आली नाही. गेल्या हंगामात बंगळूरु संघाच्या पहिल्या ङ्गआयपीएलफ जेतेपदाचा जल्लोष करण्यासाठी काढण्यात आलेल्या विजयी मिरवणुकीदरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरी झाली होती. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला. अशी स्थिती पुन्हा ओढवू नये, तसेच चिन्नास्वामी स्टेडियमजवळच असलेल्या लोकभवनात डी. के. शिवकुमार यांचा मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा नियोजित असल्याने बंगळूरु संघाने विजयी मिरवणूक काढणे टाळले.

## टीम इंडिया आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी सज्ज

मुंबई-आयपीएल स्पर्धेचं १९वं पर्व मोठ्या दिमाखात पार पडले आहे. वर्ष २०२६ च्या सुरूवातीला वुमन्स प्रीमियर लीग स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जेतेपद मिळवलं होतं. त्यानंतर आता पुरूषांच्या संघाने अंतिम फेरीत गुजरात टायटन्सला मात दिली आणि आयपीएल २०२६ जेतेपदावर नाव कोरले. यंदाच्या पर्वात (पुरुष संघ ) आरसीबीने जेतेपद कायम राखले. सलग दुसऱ्यांदा जेतेपदाला गवसणी घातली आहे. टीम इंडिया आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी सज्ज. आता फ्रेंचायझी क्रिकेटमधून बाहेर येत टीम इंडिया आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी सज्ज झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर वनडे, टी२० आणि कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे. त्यामुळे आता टीम इंडिया आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. भारताच्या वनडे आणि कसोटी संघाचं नेतृत्व शुबमन गिलच्या खांद्यावर आहे. तर टी२० संघाचं कर्णधारपदी सूर्यकुमार यादवकडे असू शकते.२०२६ पर्यंतचं क्रिकेट वेळापत्रक समोर-भारतीय संघाचं डिसेंबर २०२६ पर्यंतचं क्रिकेट वेळापत्रक समोर आलं आहे. ६ जूनपासून सामन्यांना सुरुवात होणार असून पहिला सामना न्यू चंदीगडच्या मैदानात होणार आहे. या मैदानात भारत आणि अफगाणिस्तान आमने सामने असणार आहे. हा कसोटी सामना असून त्यानंतर वनडे आणि टी२० मालिका खेळल्या जातील.टीम इंडियाचे आंतरराष्ट्रीय वेळापत्रक जून २०२६६-१०

**जून: भारत-अफगाणिस्तान कसोटी सामना**

१३-२० जून: भारत-अफगाणिस्तान


## आरसीबी चा माजी खेळाडू बनला मंत्री; भाजपा सरकारने दिली मोठी जबाबदारी

कोलकाता-पश्चिम बंगालमधील सुवेंदू सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा सोमवार, १ जून रोजी संपन्न झाला. राज्यपाल आर. एन. रवी यांच्या उपस्थितीत राजभवनात झालेल्या शपथविधी सोहळ्यात एकूण ३५ मंत्र्यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि भाजपाचे अनेक वरिष्ठ नेते व पक्षाचे अधिकारी उपस्थित होते.
दिंडाने राज्यमंत्री पदाची घेतली शपथ : नबन्ना इथं झालेल्या या सोहळ्याची सुरुवात कॅबिनेट मंत्र्यांच्या शपथविधीनं झाली. सात आमदारांनी कॅबिनेट मंत्री म्हणून, त्यानंतर तिघांनी राज्यमंत्री म्हणून आणि अखेरीस १९ आमदारांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. भारतीय संघाचा माजी वेगवान गोलंदाज अशोक दिंडा देखील बंगाल सरकारमध्ये मंत्री झाला आहेत. त्यांनी राज्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिंडानं भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) तिकिटावर मोयना मतदारसंघातून प्रचंड विजय मिळवला होता. त्यानं प्रतिस्पर्धी, ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसचे चंदन मंडल यांचा १६,२४१ मतांनी पराभव केला.
सलग दुसऱ्यांदा मिळवला विजय : अशोक दिंडानं सलग दुसऱ्यांदा मोयना मतदारसंघ जिंकला आहे. यापूर्वी, २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत, या ४२ वर्षीय खेळाडूनं तृणमूल काँग्रेसचे संग्राम डोलुई यांचा अवघ्या १,२६० मतांनी पराभव केला होता. क्रिकेटनंतर राजकारणातील त्यांचा हा विजय भाजपसाठी एक मोठा संदेश मानला जात होता.क्रिकेट करिअर कसं : अशोक दिंडा यांची क्रिकेट कारकीर्दही लक्षणीय राहिली आहे. त्यानं डिसेंबर २००९ मध्ये श्रीलंकेविरुद्ध भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण केलं. उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज असलेल्या दिंडानं भारतासाठी १३ वनडे आणि नऊ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. त्यानं वनडे सामन्यांमध्ये १२ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १७ बळी घेतले.बंगाल क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान : बंगालच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये अशोक दिंडाचं योगदान महत्त्वपूर्ण होतं. त्यांनी इंडियन प्रीमियर लीग मध्येही स्वतःला सिद्ध केलं. दिंडानं एकूण ७८ आयपीएल सामने खेळून ६९ बळी घेतले. या काळात तो कोलकाता नाईट रायडर्स (ख्खीं), दिल्ली कॅपिटल्स, पुणे वॉरियर्स इंडिया, रॉयल चॅलेंजर्स बंगलोर आणि रायझिंग पुणे सुपरजायंट्स यांसारख्या संघांचा सदस्य होता.
२०२१ मध्ये भाजपात सामिल : क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर, अशोक दिंडा फेब्रुवारी २०२१ मध्ये भारतीय जनता पक्षात (भाजपा) सामील झाला. तेव्हापासून त्यानं राजकारणात झपाट्यानं आपलं स्थान निर्माण केलं आहे.

## आरसीबी च्या विजयाचा जल्लोष होणार, पण विजयी परेड निघणार का?



मुंबई-आयपीएल ट्रॉफी जिंकणे हा कुठल्याही संघासाठी खास क्षण असतो. १५-१५ सामने जिंकणे आणि २ महिने सतत क्रिकेट खेळल्यानंतर जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याची संधी मिळते. गेल्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्सला पराभूत करून जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती. तर या हंगामातील अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सला आपल्या घरच्या मैदानावर पराभूत केले आणि सलग दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान पटकावला. पण या विजयानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघ व्यवस्थापकांनी मोठा निर्णय घेतला आहे.
रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला पहिलं जेतेपद पटकावण्यासाठी १८ वर्ष वाट पाहावी लागली होती. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या अंतिम सामन्यानंतर दुसऱ्याच दिवशी बंगळुरूत विजयाचा जल्लोष करण्यात आला होता. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ निष्पाप



लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. हे एक प्रमुख कारण आहे.
तर दुसरं आणखी एक प्रमुख कारण म्हणजे, कर्नाटकचे नवनियुक्त मुख्यमंत्री डीके शिवकुमार शपथ घेणार आहेत. त्यांच्या शपथविधीचा कार्यक्रम लोक भवन येथे संध्याकाळी ४:१० मिनिटांनी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे हा कार्यक्रम लक्षात घेता विजयी परेड आणि सेलिब्रेशन न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासह काही खेळाडू आहेत, जे मालिका आणि पुढील स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघासोबत जोडले जाणार आहेत. त्यामुळे यावेळी कुठलंही सेलिब्रेशन केलं जाणार नाही. ''आम्ही कोणत्याही सार्वजनिक उत्सवांना परवानगी देणार नाही. जर कोणाला उत्सव साजरा करायचा असेल, तर ते घराच्या आत करू शकतात.'' असे बंगळूरु शहर पोलीस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी म्हटले होते.
या सामन्यात गुजरात टायटन्सचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना गुजरातचे फलंदाज पूर्णपणे फ्लॉप ठरले. वॉशिंग्टन सुंदरने गुजरातचा डाव सांभाळला. त्याने अर्धशतकी खेळी करून संघाची धावसंख्या १५५ धावांवर पोहोचवली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून विराट कोहलीने ७५ धावांची खेळी केली आणि ५ गडी राखून विजय मिळवला.

# आ. रमेशअप्पा कराड यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव





**लातूर/ प्रतिनिधी:** आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे, शेतकरी, शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर येथील 'प्रयाग या निवासस्थानी भाजपासह विविध राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी समाज माध्यम व दुरध्वनीच्या माध्यमातून जन्मदिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. आ. कराड मित्रपरिवाराच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीतील कार्यकर्ती, मदतनीस आणि आशा सेविकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. अभिष्टचिंतन सोहळ्यास ग्रामीण भागातील नागरीकांनी प्रचंड गर्दी केली होती. अनेक गावात ग्रामदैवतांची महापूजा करुन रमेशअपांना दीर्घाष्य लाभावे यासाठी कार्यकर्त्यांच्या वतीने महापूजा, आरती व प्रार्थना करण्यात आली.

गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, शेतकरी शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी सतत संघर्ष करणारे, गरजुंना वेळोवेळी मदत करणारे, कार्यकर्त्यांना बळ देवून मान आणि सन्मान मिळवून देणारे, हजारो कुटूंबांना आरोग्य सेवेच्या माध्यमातून दिलासा देणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे आणि आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील कार्यसम्राट आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांचा शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी जन्मदिवस मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जन्म दिनाच्या पूर्व संध्येला २९ मे रोजी रात्री भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे जाहीर कीर्तन झाले. या कीर्तनास हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

आ. रमेशअप्पा कराड मित्र परिवाराच्या वतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील एमआयटी परिसरातील प्रयाग या निवासस्थानी अभिष्ठचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयाला लातूर ग्रामीण मतदार संघातील नव्हेतर संपूर्ण जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यातील भाजपा व विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मित्रपरिवारांनी दिवसभरात आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला, पुष्पगुच्छ देवून, मिठाई भरवून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. अभिष्ठचिंतन करण्यासाठी दिवसभर मोठी गर्दी झाली होती. ग्रामीण मतदार संघातील विविध गावागावातील महिला भजनी मंडळ उत्स्फुर्तपणे अभिष्ठचिंतन सोहळ्यात सहभागी होवून भजनी मंडळातील महिलांनी आप्पासाहेबांचा यशोचित सत्कार करुन जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. बंजारा समाजातील पाचशे महिलांना अशोक राठोड यांच्या वतीने पारंपारीक बंजारा पोशाख वाटप करण्यात आला. शैक्षणिक साहित्याची तुला करण्यात आली. सकाळच्या वेळी रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणूका मातेसह लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावागावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांचा अभिषेक, महापूजा व आरती करून आ. रमेशअप्पा कराड यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तर अनेक ठिकाणी रक्तदान शिबीर, यासह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयासह इतर ठिकाणच्या रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांना जन्मदिनानिमित्त केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री गिरीश महाजन, मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री आकाश फुंडकर, मंत्री नितेश राणे, मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजीमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, माजीमंत्री आ. संजय बनसोडे, खा. धनंजय महाडिक, सुरजितसिंह ठाकुर, आ. चित्राताई वाघ, आ. प्रसाद लाड, आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे, आ. संदिप जोशी, आ. शंकर जगताप, आ. सचिन शेट्टी, आ. पराग अळवणी, आ. सुरेश खाडे, आ. मिहीर कोटेचा, आ. प्रविण दटके, आ. विक्रम काळे, आ. सुधीर पाटील, आ. नारायण कुचे, आ. प्रताप अडसर, आ. सुरेश धस, आ. प्रशांत ठाकूर, आ. चैनसुख संचेती, आ. संतोष दानवे, आ. संजय केणेकर, आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. श्वेता महाले, आ. समाधान औताडे, आ. राजन नाईक, आ. महेश लांडगे, आ. श्रीजया चव्हाण, प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन, गजानन घुगे, राम सातपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी दुरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

जन्मदिनानिमित्ताने आ. रमेशअप्पा कराड यांना श्री. अघोर महाराज व इतर त्यांच्या सहकार्यांनी मंत्रोपचारात शुभाशिर्वाद दिले. अभिष्ठचिंतन कार्यक्रम प्रसंगी तुळशीरामअण्णा कराड, काशिरामनाना कराड, सौ. संजिवनीताई कराड, राजेश कराड, सौ. शुभांगी कराड, विहार बोडके, सौ. ऋतुजा बोडके, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋशिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह कराड परिवारातील अनेक सदस्य होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

अभिष्ठचिंतन सोहळ्यात आ. रमेशअप्पा कराड यांचे आ. अभिमन्यू पवार, शिवसेनेचे ॲड. बळवंत जाधव, प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, गणेशदादा हाके, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिराजदार, महिला बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, जिप गटनेते रामचंद्र तिरुके, निलंगा पस सभापती डॉ. सुनिता वाघमारे, रेणापूर सभापती मोनिका सुर्यवंशी, देवणी सभापती अंकिता पाटील शिरुर अनंतपाळ सभापती संजय सुर्यवंशी, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष रमेशभाऊ राठी, ललितभाई शहा, लातूर अर्बन बँकेचे चेअरमन विशाल राठी, जिप सदस्य महादेव साळुंके, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने, हभप उद्धवबापू आपेगावकर, प्रदेश राष्ट्रवादीचे बबन भोसले, भाजपाचे दिलीपराव देशमुख, शैलेश लाहोटी, विक्रमकाका शिंदे, प्रदिप पाटील खंडापूरकर, युवा भिमसेनेचे पंकज काटे, शिवसेनेचे संतोष बेंबडे, भागवत सोट, रमाकांतबापू मुंडे, अशोककाका केंद्रे, शिवाजी केंद्रे, श्रीहरी मुंडे, त्र्यंबकआबा गुट्टे, वसंतराव डिघोळे, नाथसिंह देशमुख, बापूराव राठोड, अविनाश कोळी, सुभाष जाधव, स्वप्नील व्हते, देविदास काळे, दिग्विजय काथवटे, रागिणी यादव, प्रदिप मोरे, विक्रमसिंह चौहान, रोहिदास वाघमारे, बापूराव चामले, पप्पु गायकवाड, भारत चामले, सुशिलकुमार बाजपेयी, सुनिल उटगे, किरण उटगे, मुक्तेश्वर वाघदरे, दत्ताआबा पाटील अंबाजोगाईकर, राजाभाऊ औताडे, कमलाकर कोंपले, अच्युत गंगणे, भागवत गुट्टे, राजकुमार कलमे, सज्जन लोण्णाळे, गोविंद चिलकुरे, बालासाहेब शेप, बापूराव केंद्रे, रामेश्वर बद्दर, अरुण समुद्रे, जयप्रकाश दगडे, चंद्रकांत झरीकुंटे, शशिकांत पाटील, जावेद शेख, संजय देशपांडे, हारुण सय्यद, डी. एन. केंद्रे, विजय क्षिरसागर, गुंडाप्पा पाटील, धर्मपाल देवशेट्टे, अनंत गायकवाड, गिरीष पाटील, गणेश गवारे, दिपाताई गित्ते, अर्जुन जाधव, जगदिश कुलकर्णी, वैशाली लोंढे, क्रेडाईचे उदय पाटील, संतोष हात्ते, महेश नावंदर, जयकांत गित्ते, गोपाळ जोशी, अभिजित देशपांदे, किशोर कुलकर्णी, प्रकाश सोनवणे, संतोष वाघमारे, सुशांत पाटील, महेश पाटील, शंकर रोडगे, चंद्रभान जाधव, प्रकाश पाटील, रत्नाकर औसेकर, बाबू खंदाडे, राजेंद्र लोदगेकर, व्यंकट पन्हाळे, रोहिणी देशमुख, अभिमान वायबसे, बाबाराव बारवाड, राजपाल भंडे, काशिनाथ गरीबे, संजय अग्रवाल, शिवम देवशेटवार, मस्तान शेख, ॲड. अविनाश इरपतगिरे, ॲड. मनोज कराड, ॲड. किरण बडे, ॲड. शिवाजी नागरगोजे, ॲड. केदार, ॲड. मोहन सिरसाट, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, अभिषेक अकनगिरे, अनिल भिसे, पांडूरंग बालवाड, ॲड. दशरथ सरवदे, उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, शरद देरेकर, राजकिरण साठे, बन्सी भिसे, वैभव सापसोड, डॉ. बाबासाहेब घुले, गणेश हेड्डा, महेंद्र जाधवर, प्रा. रघुनाथ केंद्रे, सुनिल होनराव, हणमंत देवकते, संतोष कोटलवार, बालासाहेब गुट्टे, जयंत गंगणे महाराज, दिलीप धोत्रे, विष्णु गोरे, ऋषिकेश बद्दे, व्यंकटराव आनामे मामा, विष्णु मदने, रवि सुर्यवंशी, नागनाथ गित्ते, सुभाष धोत्रे, अमोल पाटील, बबन चोले, अमर भोसले, एकनाथ काळे, सुनिल सुर्यवंशी, भालचंद्र सुर्यवंशी, डॉ. बोरगावकर, शिवासिंह सिसोदिया, श्रद्धा जगताप, हेमा येळे, पुजा कांबळे, शितल पाटील, ललिता कांबळे, अनुसया फड, सुरेखा पुरी, जया काबरा, शिला आचार्य, लता भोसले, शृती सवई, सविता खाडप, जणाबाई साखरे, उषा रोडगे, सुरेखा मुळे, सिमा करपे, कल्पना मोरे, संजय विरुळे, वसंत करमुडे, ॲड. धनराज शिंदे, संजय ठाकूर, गोपाळ पाटील, रमेश पाटील, गोविंद गिरी, युवराज पाटील, श्रीकृष्ण जाधव, उमेश सोमानी, ज्ञानोबा भिसे, दिपक वांगसकर, अनंत चव्हाण, मुन्ना गुरले, विजय चव्हाण, प्रा. धनंजय बिक्कड, विश्वास कावळे, ॲड. श्रीकांत बोराडे, काशीनाथ ढगे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, महेश गाडे, अशोक राठोड, उत्तम चव्हाण, महेश कणसे, लक्ष्मण यादव, संजय डोंगरे, धम्मानंद घोडके, नारायण राठोड, रविंद्र नागरगोजे, माधव घुले, श्रीमंत नागरगोजे, संतोष चव्हाण, किशन क्षिरसागर, लहु शेवाळे, भागवत गित्ते, राजु आलापुरे, पार्वती सोमवंशी, बालाजी दुटाळ, शंकर चव्हाण, प्रशांत शिंदे, श्रीकांत कुंभार, सिद्धेश्वर मामडगे, माणिक आलुरे, बाबुराव कस्तुरे, भिमराव मुंडे, श्रीनिवास उगिले, विठ्ठल बोडके, प्रविण कोतवाड, मनसेचे बाळासाहेब मुंडे, भागवत शिंदे, नंदकुमार साळुंके, अमोल गित्ते, अजित पाटील, राज जाधव, बळवंत कराड, प्रकाश जाधव, राहुल नागरगोजे, रामानंद मुंडे, बाबा भिसे, प्रशांत मोटे, पिंटू डोंगरे, नरसिंग सुरवसे, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, गोविंद मुंडे, किरण मुंडे, समाधान कदम, बालाजी गवळी, वैजनाथ हाराळे, हणमंत गव्हाणे, पुंडलिक बेंबडे, सुभाष राठोड, संतोष राठोड, बालासाहेब कदम, दिलीप चव्हाण, भैरवनाथ पिसाळ, ईश्वर बुलबुले, जगदिश माळी, ज्ञानेश्वर जुगल, नरसिंग यलगटे, नवनाथ मुरकुटे, यांच्यासह लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावातील वाडीवस्तीतील भाजपा व इतर विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, व्यापारी, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते त्याचबरोबर विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी आदींनी आ. रमेशअप्पा कराड यांना प्रत्यक्ष भेटून यथोचित सत्कार करुन जन्मदिनानिमित्ताने शुभेच्छा दिल्या.

## पीक विम्यासाठी शेतकरी संघटनेचे सोमवारी लातुरात कृषी अधीक्षक कार्यालयासमोर चाबूक आंदोलन, शेतकरी संघटनेचे नेते गजानन बोळंगे यांची माहिती

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील केवळ तीन महसूल मंडळातच शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर झाला आहे. गतावर्षी अतिवृष्टीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक पूर्ण खरडून गेले. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र रेणापूर तालुक्यातील पानगाव आणि औसा तालुक्यातील भादा, बेलकुंड महसूल मंडळातील

शेतकऱ्यांना विमा मंजूर झाला. इतर महसूल मंडळातील पीक नुकसानीची दाखलंच घेण्यात आली नाही. याला जिल्हा कृषी कार्यालय आणि आय सी आय सी आय लोम्बर्ड विमा कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांचा पीकविमा तात्काळ देण्यात यावा. या मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या



वतीने सोमवारी दिनांक १ जून रोजी लातूर येथील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर सकाळी ११ वाजता चाबूक आंदोलन करण्यात येणार आहे. असा इशारा शेतकरी संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. आणि या आंदोलनात शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सर्वशेतकऱ्यांनी सोबत येताना चाबूक घेऊन यावे येणाऱ्या काळात जर विमा आला नाही तर शेतकरी संघटना आयसीआयसी लोबार्ड कंपनीचा ऑफिस फोडण्याचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

## किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

### १ जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जूनपर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी.

शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये.

* विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

## सायली कुलकर्णीने नारदीय कीर्तनातून उलगडले स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनाचे अनेक पैलू




**उदगीर/गप्रतिनिधी:** लहान वयातील कीर्तनकार म्हणून उदयास येत असलेल्या ह. भ. प. सायली कुलकर्णी हिने आपल्या नारदीय कीर्तनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जीवनप्रवासातील काही महत्वपूर्ण घटना विषद करून त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू उपस्थित रसिकासमोर उलगडले. उदगीर येथील संस्कार भारती शाखेच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची १४३ वी जयंती, वंदे मातरम या गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव व राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे शताब्दी वर्षे याचे औचित्य साधून ह. भ. प. सायली उमाकांत कुलकर्णी हिच्या नारदीय कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारती उदगीर शाखेचे अध्यक्ष सतीश उस्तुरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत अध्यक्षा प्रा. स्नेहल पाठक यांची उपस्थिती होती.

यावेळी सायली कुलकर्णी यांनी आपल्या नारदीय कीर्तनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे चरित्र मांडताना देशभक्ती ही सावरकर यांच्या अंतःकरणात ओतप्रोत भरलेली होती. या देशभक्तीतूनच त्यांनी अनेक महत्वपूर्ण ग्रंथाचे लिखाण केले असल्याचे सांगत संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अनेक अभंगाचा दाखला देऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्व विषद केले.

यावेळी बोलताना प्रा. स्नेहल पाठक यांनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे केवळ देशभक्तच नव्हते तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासोबत त्यांनी सामाजिक प्रबोधनावर भर दिला असल्याचे सांगत संस्कार भारतीच्या माध्यमातून नारदीय कीर्तनासारखा उपक्रम राबविण्यात आला हे कौतुकास्पद आहे. नवीन कलाकारांना सांस्कृतीक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी उदगीरच्या संस्कार भारतीने सातत्याने पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात सतीश उस्तुरे यांनी संस्कार भारती उदगीर शाखेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती देऊन आगामी काळात सर्वांच्या सहकार्यातून कलोपासनेचे उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर व भारतमातेच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. संस्कार भारतीचे ध्येयगीत गोपाळ जोशी यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय गुडसूरकर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीपाद सिमंतकर यांनी केले. आभार डॉ. रविकांत पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार भारतीचे मार्गदर्शक डॉ. संजय कुलकर्णी, अजय दंडवते, सचिव विक्रम हलकीकर, कोषाध्यक्ष योगेश मूर्के, प्रा. मुकेश कुलकर्णी, प्रदीप पत्तेवार, प्रा. प्रसाद जालनापूरकर, प्रा. गौरव जेवळीकर, प्रा. राहुल आलापुरे, बालाजी मूर्के यांच्यासह संस्कार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९



# मंत्रालय ते पोलीस चौकी आता 'ऑनलाईन' माहिती अधिकारात डिजिटल क्रांती; सामान्य नागरिकांना दिलासा!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे ) राज्यातील माहिती अधिकार व्यवस्थेत आता मोठी डिजिटल क्रांती घडणार असून मंत्रालयापासून थेट ग्रामपंचायत आणि पोलीस चौकीपर्यंतची माहिती नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज कमी होणार असून पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने हे मोठे पाऊल मानले जात आहे.

आतापर्यंत माहिती अधिकारासाठी नागरिकांना तहसील, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस ठाणे आणि विविध विभागांचे चकरा माराव्या लागत होत्या. अनेक वेळा अर्ज स्विकारण्यास टाळाटाळ, माहिती देण्यास विलंब आणि नागरिकांची अडवणूक होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. मात्र आता शासनाने डिजिटल पोर्टल प्रणालीद्वारे सर्व माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध करण्याची तयारी सुरू केली आहे.

विशेष म्हणजे प्रत्येक कार्यालयात नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून संबंधित विभागाची माहिती थेट पोर्टलवर अपलोड केली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या कार्यालयात कोणती माहिती उपलब्ध आहे, कोण अधिकारी आहे आणि अर्जाची स्थिती काय आहे हे नागरिकांना घरबसल्या समजणार आहे.

गावपातळीपर्यंत पोहोचणार व्यवस्था

ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती, नगर परिषद, जिल्हा परिषद तसेच पोलीस चौक्या या सर्व यंत्रणा आता ऑनलाईन माहिती अधिकार व्यवस्थेशी जोडल्या जाणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठा फायदा होणार आहे.

भ्रष्टाचाराला बसणार आळा?

माहिती लपवणे, अर्ज दडपणे आणि नागरिकांना फिरवणे या प्रकारांना आता मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रशासनातील पारदर्शकता वाढल्यास अनेक गैरप्रकार उघड होण्याची शक्यता असल्याने काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये मात्र खळबळ उडाली आहे.

सरकारचा हा निर्णय योग्य पद्धतीने राबवला गेला तर सामान्य माणसाला मोठा दिलासा मिळेल. मात्र फक्त घोषणा नकोत, प्रत्यक्ष अंमलबजावणीही तितकीच प्रभावी झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# धाराशिवच्या सामान्य कुटुंबात जन्मलेल्या साहिल शेखची मुंबई पोलीस दलात भरारी



धाराशिव (शेख अंजुम)- जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते, हे धाराशिव शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील युवक साहिल साजिद शेख याने सिद्ध करून दाखवले आहे. अत्यंत मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या परिस्थितीत वाढलेल्या साहिलची मुंबई शहर पोलीस दलात निवड झाली असून त्याच्या या यशामुळे कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

धाराशिव शहरातील सोलापूर रोड परिसरातील आगड गल्ली येथे राहणारा साहिल शेख हा सर्वसामान्य कुटुंबातील युवक आहे. त्याचे वडील साजिद सलीम शेख हे लाकडाचा छोटा-मोठा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मर्यादित उत्पन्न आणि अनेक आर्थिक अडचणी असूनही त्यांनी मुलांच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. कुटुंबाची परिस्थिती बेताची असतानाही साहिलने परिस्थितीसमोर हार न मानता आपल्या ध्येयाचा पाठपुरावा सुरू ठेवला.

लहानपणापासूनच पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या साहिलने शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा आणि शारीरिक तयारीवर विशेष भर दिला. आर्थिक अडचणी, मर्यादित साधनसामग्री आणि अनेक आव्हाने असूनही त्याने आपली जिद्द कायम ठेवली. नियमित अभ्यास, कठोर मेहनत आणि एकाग्रतेच्या जोरावर त्याने अखेर मुंबई शहर पोलीस दलात स्थान मिळवले.

साहिलच्या यशामागे त्याच्या आई-वडिलांचा मोठा त्याग आणि पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. मुलाने नोकरी मिळवून कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, या उद्देशाने त्यांनी त्याच्यावर कोणतीही अतिरिक्त जबाबदारी टाकली नाही. अभ्यास आणि भरतीची तयारी यासाठी त्याला आवश्यक ते स्वातंत्र्य व प्रोत्साहन दिले. आई-वडिलांच्या विश्वासाला आणि कष्टांना न्याय देत साहिलने हे यश संपादन केले.

मुंबई पोलीस दलात निवड झाल्याची बातमी समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. शहरातील विविध भागांत त्याच्या अभिनंदनाचे फलक झळकले असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे. सामान्य कुटुंबातील युवकाने स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर मिळवलेले हे यश आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या बळावर कोणतीही परिस्थिती बदलता येते, याचे साहिल शेख हे जिवंत उदाहरण ठरले असून त्याच्या यशामुळे धाराशिव शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# अखंड मानव कल्याणाचे प्रतीक: आमदार स्वामी यांचे प्रतिपादन



उमरगा(प्रतिनिधी)-मल्हारराव होळकर यांनी दिलेल्या राज्यकौशल्याच्या बळावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी अंधश्रद्धेला मूठमाती देत, रूढी-परंपरांना न जुमानता पांढऱ्या घोंगडीवर बसून मराठा साम्राज्याचा कारभार चालवला. जात, पात आणि धर्माचा भेद न करता अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले, असे प्रतिपादन आमदार प्रवीण स्वामी यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रवीण स्वामी, डॉ. राजू शेंडगे आणि डॉ. विजय बेडदुर्गे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यानंतर आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच महादेव मंदिर सभागृहात मोफत आरोग्य शिबिराचे उदघाटन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक, नगरसेविका तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी जयंती समितीचे अध्यक्ष गोपाळ घोडके, अरुण गडदे, मारोती घोडके, हिरा घोडके, बालाजी दिनकर घोडके, बालाजी धोंडिबा घोडके, जालिंदर सोनटक्के, दिलीप घोडके, धनराज घोडके, तेजप्रकाश बघेल, नगरसेवक राहुल शिंदे, नगरसेविका सुप्रिया घोडके, कालिंदाताई घोडके, ज्योती बनसोडे, कमलबाई घोडके, शशिकला घोडके यांच्यासह समाजबांधव व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. दरम्यान, तालुका काँग्रेस भवन येथेही पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून विचार व कार्याचा जागर करण्यात आला.कार्यक्रमात बोलताना ॲड. एस. पी. इनामदार यांनी सांगितले की, अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभार करताना स्वराज्याचे रक्षण करण्याबरोबरच शेतकऱ्यांसाठी तलाव व विहिरींचे नूतनीकरण करून जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. धार्मिक वृत्ती असूनही त्या अंधश्रद्धाळू नव्हत्या. त्यांनी बारा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला आणि जनतेची सेवा करताना शत्रूंनाही धडा शिकवणाऱ्या त्या खऱ्या रणरागिणी होत्या. या कार्यक्रमास काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार, उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, नगरसेवक अभिजित मोरे, बाबा मस्के, इरफान शेख, तालुका संघटक ख्वाजा मुजावर, विधिज्ञ सेलचे तालुकाध्यक्ष ड. एस. पी. इनामदार, माजी पंचायत समिती सदस्य अभिमन्यू भोसले, दयानंद पाटील, जीवन सरपे, जालिंदर सोनटक्के आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ख्वाजा मुजावर यांनी केले, तर आभार अभिजित मोरे यांनी मानले.

जयंतीनिमित्त विविध उपक्रम अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त उमरग्यात रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य शिबिर, प्रतिमापूजन आणि भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांमुळे जयंतीला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली. नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त लोहाऱ्यात अभिवादन:रक्तदान शिबिर



लोहारा (प्रतिनिधी)-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या वतीने लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रविवारी (दि.३१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोहारा पं.स. सभापती पल्लवी जानकर, पं.स.सदस्य दत्ता वाघमारे, माजी सरपंच नागण्णा वकील, चंद्रकांत पाटील, माजी गटनेते अभिमान खराडे, शंकर जट्टे, शब्बीर गवंडी, उपनगराध्यक्ष अमिन सुंबेकर, उबाठा शिवसेना तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, नगरसेवक विजयकुमार ढगे, पं. स. माजी सदस्य दिपक रोडगे आदींसह विविध पक्षांचे राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान, शहरातील श्रीगिरे हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात २० रक्तदात्यांनी रक्तदान केले. धाराशिव येथील सह्याद्री ब्लड बँकेच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले.

# अधिक महिन्यातील पौर्णिमेनिमित्त मातेच्या दर्शनासाठी सहा तास प्रतीक्षा:रविवारी दीड लाख भाविकांनी घेतले दर्शन

तुळजापूर (प्रतिनिधी)- अधिक महिन्यातील पौर्णिमा आणि रविवारची सुट्टी यांचा योग जुळून आल्याने रविवारी (दि. ३१) तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली. दिवसभरात सुमारे दीड लाख भाविकांनी तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. वाढलेल्या गर्दीमुळे धर्म दर्शनासाठी भाविकांना सहा तास प्रतीक्षा करावी लागली. दरम्यान मंदिर संस्थानच्या ढिसाळ नियोजनामुळे शनिवार (दि. ३०) रात्री दोन तास हजारो भाविक दर्शन मंडपात अडकले.

उन्हाळी सुट्ट्यां तसेच अधिक मांसातील पोर्णिमा व रविवारचा योग साधत रविवारी दिड लाख भाविकांनी तुळजाई नगरीत हजेरी लावली. रविवारी पहाटेपासून दर्शन मंडपाचे सर्व मजले भाविकांच्या गर्दीने भरले होते. धर्म दर्शनाला सहा तास वेळ लागत असल्याचे मंदिर संस्थानच्या वतीने ध्वनी क्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येत होते. मुख दर्शनाला तीन तास, सशुल्क दर्शनाला दोन ते अडीच तास तर स्पेशल दर्शन (५०० रुपये) ला एक तास वेळ लागत होता.



रविवारी सायंकाळी चार नंतर गर्दी ओसरली.

तत्पूर्वी रविवारी पहाटे ०१ वा. चरणतीर्थ पुजेनंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले तर सकाळी ०६ वा. अभिषेक पुजेला प्रारंभ करण्यात आला. तर सायंकाळच्या अभिषेक पुजेनंतर रात्री उशीरा पौर्णिमानिमित्त संभळाचा कडकडाटात छबीना मिरवणूक काढण्यात आली.

## चाकुचा धाक दाखवून सोन्याचे गंठण, सोन्याच्या बाळ्याची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, फिर्यादी राधा भरत क्षिरसागर, वय ४९ वर्षे, रा. खोताची वाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि. २६.०४.२०२६ रोजी शेतातुन घराकडे एकट्याच जात असताना मोटरसायकलवरुन राहुल सुनिल भोसले, सुनिल हुलप्पा भोसले, विशाल भागवत शिंदे सर्व रा. धनेगाव ता. तुळजापूर यांनी फिर्यादीस गैबीसाहेब दर्ग्याजवळ खोताची वाडी येथे चाकुचा धाक दाखवून गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅम सोन्याच्या बाळ्या काढुन घेवून पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राधा क्षिरसागर यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत विजयकुमार हनमंत बारकुल, वय ४२ वर्षे, रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ३५,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. २४.०५.२०२६ रोजी फिर्यादीचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **INAMADAR SYED SHAH HUSSAIN** TO: **INAMDAR SYED SHAHA HUSSAIN SYED ABDUL HAI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use INAMADAR SYED SHAHA HUSSAIN SYED ABDUL HAI in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **INAMDAR SYED SHAH HUSSAIN**
NEW NAME :- **INAMDAR SYED SHAHA HUSSAIN SYED ABDUL HAI**
Address - Inamadar Gall Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar No. 731799985286
Mob. No.9860065911

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **INAMADAR SAYYEDA UMMEHABEEBA SHAHA HUSSAIN INAMDAR** TO: **SAYYADA UMME HABEEBA SHAHA HUSSAIN INAMDAR**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SAYYADA UMME HABEEBA SHAHA HUSSAIN INAMDAR in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **INAMDAR SAYYEDA UMMEHABEEBA SAYYED ABDUL BASET**
NEW NAME :- **INAMDAR. SAYYADA UMME HABEEBA SHAHA HUSSAIN INAMDAR**
Address - Inamadar Gall Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar No. 252232122234
Mob. No. 9860065911

## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

**9422472502**
**9175325708**
**9284321472**

## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE AM KADAM RAJESH ARUN DECLARING THAT I AM CHANGING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : KADAM AARADHYA RAEJSH. TO KADAM AARADHYA RAJESH. HENCE FOR THIS DECLARATION HE WILL BE KNOWN BY THIS NANE AND HE WILL USE KADAM AARADHYA RAJESH. IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY OUR FAMILY AND RELATIVE.
MY SONS OLD NAME : **KADAM AARADHYA RAEJSH**
MY SONS NEW NAME : **KADAM AARADHYA RAJESH**
ADDRESS : SNEH NIVAS SOCIETY, ANAND NAGAR. OSMANABAD.- 413501.
MOB NO. 9422070229.


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649